# Module I
# स्थूल अर्थशास्त्र

**प्रास्ताविक :-**

सूक्ष्म अर्थशास्त्र (Micro Economics) आणि स्थूल अर्थशास्त्र (Macro Economics) या आर्थिक विश्लेषणाच्या दोन पद्धती आहेत. स्थूल अर्थशास्त्रास साकलिक अर्थशास्त्र असे म्हणतात. स्थूल अर्थशास्त्रास समग्रलक्षी अर्थशास्त्र असेही म्हणतात. समग्र म्हणजे संपूर्ण किंवा एकूण होय. म्हणून संपूर्ण अर्थशास्त्राचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे समग्रलक्षी अर्थशास्त्र होय. स्थूल अर्थशास्त्रास समष्टी अर्थशास्त्र असेही म्हणतात. समष्टी म्हणजे समाज होय. म्हणून समाजाचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे स्थूल अर्थशास्त्र होय. अर्थव्यवस्थेतील समुच्चयांचा किंवा सरासरींचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे स्थूल अर्थशास्त्र होय. अशीही स्थूल अर्थशास्त्राची व्याख्या सांगितली जाते. प्रा. केनेथ इ. बोलिंडग यांनी स्थूल अर्थशास्त्रावी व्याख्या खालीलप्रमाणे दिली आहे.

''स्थूल अर्थशास्त्र हे व्यक्तिगत घटकांचा अभ्यास करत नाही, तर सामूहिक घटकांचा अभ्यास करते. व्यक्तिगत उत्पन्नाचा अभ्यास करत नाही, तर राष्ट्रीय उत्पन्नाचा अभ्यास करते. व्यक्तिगत किंमतींचा अभ्यास करत नाही, तर सर्वसाधारण किंमत पातळीचा अभ्यास करते. व्यक्तिगत उत्पादनाचा अभ्यास करत नाही तर राष्ट्रीय उत्पादनाचा अभ्यास करते.''

प्रा. बोलिंडग यांच्या वरील व्याख्येवरून आपणास सूक्ष्म अर्थशास्त्र आणि स्थूल अर्थशास्त्र यातील फरक लक्षात येतो. उदाहरणार्थ सूक्ष्म अर्थशास्त्र व्यक्तिगत घटकांचा अभ्यास करते. तर स्थूल अर्थशास्त्र मात्र सामूहिक घटकांचा किंवा समुच्चयांचा अथवा सरासरीचा अभ्यास करते. सूक्ष्म अर्थशास्त्र व्यक्तिगत उत्पादनाचा अभ्यास करते, तर स्थूल अर्थशास्त्र राष्ट्रीय उत्पादनाचा अभ्यास करते. थोडक्यात, अर्थव्यवस्थेतील लहानात लहान घटकांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे सूक्ष्मलक्षी किंवा अंशलक्षी अर्थशास्त्र होय. तर अर्थव्यवस्थेतील मोठ्या घटकांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे स्थूल अर्थशास्त्र (Macro Economics) होय. राष्ट्रीय उत्पादन, राष्ट्रीय उत्पन्न, एकूण बचत, एकूण गुंतवणूक, एकूण मागणी, एकूण पुरवठा अशा मोठ्या आर्थिक घटकांचा अभ्यास स्थूल अर्थशास्त्रात केला जातो.

**स्थूल अर्थशास्त्राचे स्वरूप :-**

स्थूल अर्थशास्त्रात मागणी आणि पुरवठा या दोन घटकांचा एकमेकांवर काय परिणाम होतो? याचा अभ्यास केला जातो. स्थूल अर्थशास्त्रात समुच्चयांचा किंवा सरासरीचा अभ्यास केला जातो. स्थूल अर्थशास्त्रात उत्पन्नातील बदलांचा मागणी व पुरवठ्यावर होणारा परिणाम विचारात घेतला जातो. सूक्ष्म अर्थशास्त्र विशिष्ट वस्तूच्या मागणीचा विचार करते. पण स्थूल अर्थशास्त्र हे एकूण मागणीचा (देशातील सर्व लोकांच्या एकत्रित मागणीचा) विचार करते. सूक्ष्म अर्थशास्त्र एकूण पुरवठ्याचा विचार करते. स्थूल अर्थशास्त्रात वस्तूची मागणी व पुरवठा पैशात सांगितला जातो.

**स्थूल अर्थशास्त्राची व्याप्ती :-**

स्थूल अर्थशास्त्रात प्रामुख्याने स्थूल आर्थिक सिद्धांतांचा आणि स्थूल आर्थिक धोरणांचा अभ्यास केला जातो. ही स्थूल अर्थशास्त्राची व्याप्ती आहे. स्थूल अर्थशास्त्राची व्याप्ती खालीलप्रमाणे स्पष्ट केली आहे.

(१) सर्वसाधारण किंमत पातळी

(२) आंतरराष्ट्रीय व्यापार

(३) उत्पन्न व रोजगार

(४) व्यापारचक्राचे सिद्धांत

(५) विभाजनाचा समग्रलक्षी सिद्धांत

(६) आर्थिक वृद्धीचे सिद्धांत

(७) समग्रलक्षी आर्थिक धोरणे

**समग्रलक्षी आर्थिक चले (Mqro Economic Variables) :-**

चल घटक आणि अचल घटक असे मापनाच्या आधारावर वर्गीकरण केले जाते. ज्या घटकांचे मूल्य (वय, वजन, किंमत, लांबी) बदलत असते, त्या घटकांना चल (Variable) असे म्हणतात. तर ज्या घटकांचे मूल्य बदलत नसते, स्थिर असते, त्या घटकांना अचल किंवा स्थिर घटक (Constant factors) असे म्हणतात. गावाची किंवा देशाची लोकसंख्या, लोकांचे वय, उंची, बेकार व्यक्तींची संख्या, वस्तूची किंमत, नफा, चलनाची किंमत या घटकांना बदलते घटक किंवा चले (Variables) असे म्हणतात. कारण या घटकांच्या मूल्यात (किंमतीत, लोकसंख्येत) सतत कमी किंवा जास्त बदल होत असतात. काही घटकांचे मूल्य बदलत नाही. मूल्य (क्षेत्रफळ, उंची) स्थिर असते. त्या घटकांना अचल घटक किंवा स्थिर घटक असे म्हणतात. उदाहरणार्थ एखाद्या गावाचे किंवा देशाचे भौगोलिक क्षेत्रफळ, शहराची समुद्रसपाटीपासूनची उंची, इत्यादी आर्थिक चलांचा अभ्यास महत्वाचा असतो. आर्थिक चलांच्या साहाय्याने लोकसंख्येतील बदल समजतात, तेजी-मंदी स्पष्ट होते. आर्थिक विकास कितपत झाला आहे? किंवा आर्थिक विकास होत आहे की नाही? ते समजते. देशाची आर्थिक स्थिती समजून घेण्यासाठी आर्थिक चलांचा उपयोग होतो. काही समग्रलक्षी आर्थिक चले पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहेत.

**(१) रोजगार :-**

देशातील रोजगार पातळीत सतत बदल होत असतो. एखाद्या देशात रोजगार वाढत असतो किंवा रोजगार घटत असतो. म्हणून रोजगार हे प्रमुख आर्थिक चल मानले जाते. रोजगार किंवा बेकारी ही आर्थिक चले आहेत. भारतासारख्या देशात बेकारीची समस्या आढळून येते. काही देशात बेकारी कमी होत आहे. तर काही देशात बेकारी वाढत आहे. म्हणून बेकारी हे समग्रलक्षी आर्थिक चल मानले जाते. रोजगारावर काही घटकांचा प्रभाव पडत असतो. प्रभावी मागणीने रोजगार पातळी प्रभावित होत असते. प्रभावी मागणी म्हणजे संपूर्ण समाजाची वस्तू व सेवांना असणारी एकूण किंवा एकत्रित मागणी होय. यालाच एकूण उपभोग

असे म्हणतात. प्रभावी मागणी जितकी जास्त तितकी रोजगार पातळी अधिक राहते. प्रभावी मागणीत वाढ झाल्यास वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी अधिक उत्पादन करावे लागते. अधिक उत्पादन करण्यासाठी भूमी, श्रम, भांडवल, संयोजन या उत्पादन घटकांची मागणी वाढते. त्यामुळे या घटकांना रोजगार मिळून एकूण रोजगार पातळीत वाढ होते. याउलट समाजाची विविध वस्तू व सेवांना असणारी मागणी (प्रभावी मागणी किंवा एकूण मागणी) कमी झाली तर नुकसान टाळण्यासाठी उत्पादक उत्पादन कमी करतात. त्यामुळे काही उत्पादन घटकांना मागणी कमी येते. श्रम, भांडवल इ. उत्पादन घटकांची बेकारी वाढते. अशा प्रकारे प्रभावी मागणी कमी झाली की रोजगार कमी होतो. म्हणजेच बेकारी वाढते. कृषी, उद्योग, व्यापार, सेवा (वाहतूक, दळणवळण इत्यादी) क्षेत्रात गुंतवणूक अधिक किंवा पुरेशा प्रमाणात केली तर उत्पादन घटकांची व उत्पादन साधनांची मागणी वाढून रोजगारात वाढ होते.

बेरोजगारीचे अनेक आर्थिक, सामाजिक दुष्परिणाम समाजाला, बेरोजगार कुटुंबाला आणि अर्थव्यवस्थेला भोगावे लागतात. बेकारीमुळे श्रमशक्तीचा अपव्यय होतो. आर्थिक विकासावर प्रतिकूल परिणाम होतो. म्हणून जगातील प्रत्येक देश बेकारी नष्ट करण्यासाठी प्रयत्न करत असतो. पूर्ण रोजगाराचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जगातील अनेक देश प्रयत्न करत असतात. विकसित देशात बेकारीचे प्रमाण ३टक्के पेक्षा कमी असते. तर अविकसित आणि विकसनशील देशात ते १०टक्के पेक्षा जास्त असते. स्वातंत्र्योत्तर काळात ८० वर्षात भारताचा अफाट आर्थिक विकास झाला असला तरी बेकारीची समस्या ही अद्याप गंभीरच आहे. वाढती लोकसंख्या हा प्रमुख घटक त्यास कारणीभूत आहे. अशा प्रकारे रोजगार किंवा बेरोजगार हे प्रमुख आर्थिक चल मानले जाते, बेकारीची किंवा रोजगाराची समस्या ही एका व्यक्ती पुरती संबंधित नसून संपूर्ण समाजाला/अर्थव्यवस्थेला आणि सरकारला भेडसावणारी ती उग्र समस्या आहे. म्हणून बेकारीच्या समस्येला स्थूल आर्थिक समस्या असे म्हणतात. खालील सूत्राने रोजगाराचे प्रमाण काढतात.

$$\text{रोजगार प्रमाण} = \frac{\text{काम करणाऱ्या (रोजगार करणाऱ्या) कामगारांची संख्या}}{\text{देशातील एकूण (सर्व) कामगारांची संख्या}} \times १००$$

देशात एकूण कामगारांची संख्या समजा १०० आहे. आणि त्यापैकी ८० श्रमिकांना रोजगार मिळाला असेल तर रोजगाराचे प्रमाण ८० टक्के येईल.

$$\text{रोजगार प्रमाण} = \frac{८०}{१००} \times १००$$

$$= ८०\%$$

अशाच प्रकारे बेकारीचे प्रमाण सुद्धा काढता येते.

$$\text{बेरोजगारीचे प्रमाण} = \frac{\text{बेरोजगार कामगारांची संख्या}}{\text{देशातील एकूण कामगारांची संख्या}} \times १००$$

समजा देशात एकूण कामगारांची संख्या १०० झाली आहे. आणि बेरोजगार कामगारांची संख्या २० असेल तर बेकारीचे प्रमाण २० टक्के येईल.

$$\text{बेरोजगार प्रमाण} = \frac{२०}{१००} \times १००$$

$$= २०\%$$

देशाचे रोजगाराचे प्रमाण कमी असेल किंवा बेरोजगारीचे प्रमाण जास्त असेल तर सरकारला रोजगारात वाढ होईल, बेकारी कमी होईल अशी आर्थिक धोरणे आखावी लागतात.

**२) राष्ट्रीय उत्पन्न :-**

राष्ट्रीय उत्पन्न हे एक प्रमुख समग्रलक्षी आर्थिक चल आहे. एका वर्षात देशात तयार झालेल्या वस्तू व सेवा यांची पैशातील किंमत म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय. अशा प्रकारे राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन पैशात केले जाते. उत्पादन पद्धत, उत्पन्न पद्धत आणि खर्च पद्धत ह्या राष्ट्रीय उत्पन्न मापनाच्या तीन पद्धती आहेत. राष्ट्रीय उत्पन्नात कमी-जास्त बदल होत असतो. कोणत्याही देशाचे राष्ट्रीय उत्पन्न स्थिर नसते. म्हणून राष्ट्रीय उत्पन्नास चल (variable) किंवा आर्थिक चल (Economic variable) असे म्हणतात. देशाचा आर्थिक विकास हा राष्ट्रीय उत्पन्नावर अवलंबून असतो. आर्थिक विकासाचे मापन करण्यासाठी 'राष्ट्रीय उत्पन्न' या चलाचा आधार घेतला जातो व त्यावरून देशाचा आर्थिक विकास होत आहे की नाही? किंवा आर्थिक विकास होत असेल तर तो कितपत झाला आहे? भविष्यात आर्थिक विकासाचा दर काय असेल? हे आपणास सांगता येते. म्हणून राष्ट्रीय उत्पन्न हे अत्यंत महत्वाचे समग्रलक्षी आर्थिक चल आहे. एखाद्या देशाच्या वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात दरवर्षी सतत वाढ होत असेल तर त्या देशात आर्थिक विकास घडून येत आहे, असे म्हणतात. किंवा ज्या दीर्घकालीन प्रक्रियेमुळे देशाच्या वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडून येते, त्या प्रक्रियेला आर्थिक विकास असे म्हणतात. ज्या देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडून येत नसेल, दरवर्षी राष्ट्रीय उत्पन्नात घट घडून येत असेल तर त्या देशाचा आर्थिक विकास होत नाही, असा निष्कर्ष निघतो. गतवर्षीच्या तुलनेत यावर्षी आर्थिक विकास किती झाला आहे? ते पाहण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्न हे चल उपयोगी पडते. एका देशाच्या विकासाची दुसऱ्या देशाच्या विकासाशी तुलना करण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्न हे चल उपयोगी पडते. अमेरिकेच्या तुलनेत किंवा चीनच्या तुलनेत आपला कितपत विकास झाला आहे? हे आपणास राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीवरूनच समजू शकते. म्हणून हे चल अत्यंत महत्वाचे आहे. राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीवरून दरडोई उत्पन्न काढता येते. राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीला देशाच्या लोकसंख्येने भागले असता आपणास दरडोई उत्पन्न समजते. देशाची लोकसंख्या स्थिर असेल आणि राष्ट्रीय उत्पन्नात सतत वृद्धी घडून येत असेल तर देशातील नागरिकांच्या सरासरी दरडोई उत्पन्नात सुद्धा वाढ घडून येते. चालू किंमतीनुसार आणि स्थिर किंमतीनुसार राष्ट्रीय उत्पन्न सांगितले जाते. एकूण राष्ट्रीय उत्पन्न, निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न, स्थूल देशांतर्गत उत्पादन (GDP), दरडोई उत्पन्न, व्ययशक्य उत्पन्न या राष्ट्रीय उत्पन्नाच्या प्रमुख संकल्पना आहेत. भूमी, श्रम, भांडवल, आणि संयोजन हे प्रमुख उत्पादनाचे घटक राष्ट्रीय उत्पन्नाची (वस्तू व सेवांची) निर्मिती करत असतात. त्याबद्दल त्यांना खंड, वेतन, व्याज आणि नफा या स्वरूपात वाटा मिळत असतो किंवा मोबदला मिळत असतो. अशा प्रकारे राष्ट्रीय उत्पन्नाचे वितरण उत्पादन घटकांमध्ये खंड, वेतन, व्याज व नफा या स्वरूपात होत असते. उत्पादनाचे

घटक आपल्याला मिळालेले मोबदले वस्तू व सेवांच्या खरेदीवर खर्च करत असतात. राष्ट्रीय उत्पन्नात सतत वाढ होत असेल तर प्रभावी मागणीत (वस्तू व सेवा यांच्या मागणीत/उपभोगात) वाढ घडून येते. त्यामुळे रोजगारात सुद्धा वाढ घडून येते. उच्च उत्पन्न गटातील देशांच्या यादीत (विकसित किंवा श्रीमंत देशांच्या यादीत) स्थान मिळवण्यासाठी जगातील प्रत्येक देश राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडवून आणण्याचा प्रयत्न करत असतो. एखादा देश विकसित आहे की अविकसित आहे अथवा विकसनशील आहे ते ठरविण्यासाठी 'राष्ट्रीय उत्पन्न' या चलाचा आधार घेतात. म्हणून राष्ट्रीय उत्पन्न हे महत्वाचे समग्रलक्षी आर्थिक चल आहे.

**(३) सर्वसाधारण किंमत पातळी :-**

सर्वसाधारण किंमत पातळी हे सुद्धा महत्वाचे समग्रलक्षी आर्थिक चल आहे. वस्तू व सेवांच्या किंमती ह्या कधीही कायम नसतात किंवा स्थिर नसतात. विविध कारणामुळे वस्तू व सेवांच्या किंमतीत बदल होत असतात. किंमती वाढत असतात किंवा किंमती घटत असतात. म्हणून किंमत हे आर्थिक चल (Economic variable) मानले जाते. सर्वसाधारण किंमत पातळी म्हणजे एका वस्तूची किंमत नव्हे. तर विविध वस्तूंच्या किंमतींची बेरीज करून त्या अंकाला किंवा संख्येला वस्तूंच्या संख्येने भागले असता सर्वसाधारण किंमत पातळी तयार होते.

$$\text{सर्वसाधारण किंमत} = \frac{\text{सर्व वस्तूंच्या किंमतींची बेरीज}}{\text{सर्व वस्तूंची संख्या}}$$

सर्वसाधारण किंमत पातळीत वाढ झाली आहे का घट झाली आहे? हे पाहण्यासाठी किंमत निर्देशांकाचा आधार घेतला जातो. किंमत निर्देशांकावरून सर्वसाधारण किंमत पातळीतील बदल मोजता येतात. सर्वसाधारण किंमत पातळीत वाढ घडून येणे म्हणजे देशात भाववाढ घडून आलेली असणे होय. कारण अनेक वस्तूंच्या किंमतींचा विचार करून सर्वसाधारण किंमत पातळी सांगितली जाते. देशात भाववाढ किंवा महागाई कितपत आहे ते पाहण्यासाठी सर्वसाधारण किंमत पातळीचा आधार घेतला जातो. सर्वसाधारण किंमत पातळीतील घट ही भावघटीची परिस्थिती दर्शविते. सर्वसाधारण किंमत पातळीत सतत वाढ घडून येत असेल तर त्याचा लोकांच्या उपभोगावर (खरेदीवर किंवा मागणीवर) वाईट परिणाम होतो. सर्वसाधारण किंमत पातळीतील वाढीने लोकांची मागणी कमी होते. राहणीमानाचा दर्जा खालावतो. पुरेशा वस्तू व सेवांचा उपभोग घेता न आल्याने आरोग्याचा दर्जा खालावतो. सर्वसाधारण किंमत पातळीत संथ गतीने वाढ होत असेल तर मात्र त्याचा लोकांच्या उपभोगावर, आरोग्यावर, राहणीमानावर विपरित परिणाम होत नाही. याउलट सर्वसाधारण किंमतपातळीत सतत व खूपच घटीची प्रवृत्ती दिसत असेल तर त्याचा उत्पादकांच्या गुंतवणूकीवर विपरित परिणाम होतो. सर्वसाधारण किंमत पातळी खूपच कमी झाली तर उत्पादकांचा नफा कमी होऊन त्यांची गुंतवणूक कमी होते. त्यामुळे बेकारी वाढते. म्हणून सर्वसाधारण किंमत पातळीत फारच घट होणार नाही आणि सर्वसाधारण किंमत पातळी खूपच वाढणार नाही याची काळजी घ्यावी लागते. ग्राहक आणि उत्पादक यांचे नुकसान होणार नाही अशा प्रकारे किंमत पातळी असली पाहिजे. सर्वसाधारण किंमत पातळीत फार मोठे बदल होत असतील तर त्याचे संपूर्ण अर्थव्यवस्थेवर विपरित परिणाम होतात. म्हणून प्रत्येक देशाचे सरकार सर्वसाधारण किंमत पातळीत फार मोठी वाढ होणार नाही आणि फार मोठी घट होणार नाही याची काळजी घेत असते.

## (४) व्यवहारशेष :-

व्यवहारशेष आणि विनियम दर ही सुद्धा महत्वाची समग्रलक्षी आर्थिक चले आहेत. व्यवहारशेष आणि विनियम दर सुद्धा स्थिर नसतात. विविध कारणामुळे त्यात कमी-जास्त बदल होत असतात. म्हणून या घटकांना चले (Variables) असे म्हणतात. व्यवहारशेष हे चल आंतरराष्ट्रीय व्यापाराशी संबंधित आहे. व्यवहारशेषास व्यवहारतोल असेही म्हणतात. एखाद्या देशाच्या आंतरराष्ट्रीय येण्या-देण्याची माहिती आपणास व्यवहारशेषावरून समजते. व्यहारशेष म्हणजे ज्यामध्ये एखाद्या देशाची येणी व देणी दर्शविलेली असतात. व्यवहारशेष म्हणजे एक प्रकारचे हिशेब पत्र असते, ज्यामध्ये एखाद्या देशातील लोकांनी वर्षभरात केलेले सर्व आंतरराष्ट्रीय व्यवहार समाविष्ट असतात. व्यवहारशेष म्हणजे एखाद्या देशाचा येणी-देणी दर्शविणारा ताळेबंद असतो. एखादा देश जगातील इतर देशाबरोबर जे आर्थिक व्यवहार करत असतो, त्या व्यवहाराचा जमा-खर्च म्हणजे व्यवहारशेष किंवा व्यवहारतोल होय. व्यवहारशेषाच्या चालू खात्यावरील जमेच्या बाजूमध्ये वस्तू व सेवांच्या निर्यातीपासून मिळणारी रक्कम दर्शविलेली असते. तर खर्चाच्या बाजूमध्ये दृष्य व अदृष्य वस्तूंच्या (वस्तू व सेवांच्या) आयातीवर खर्च केलेल्या रकमेचा समावेश असतो. व्यवहारशेषाच्या भांडवली खात्यावरील जमेच्या बाजूमध्ये इतर देशांकडून घेतलेल्या कर्जाची आणि इतर देशांनी देशात केलेल्या प्रत्यक्ष गुंतवणूकीची माहिती असते. तर भांडवली खात्यावरील खर्चाच्या बाजूमध्ये आपल्या देशाने इतर देशांना दिलेल्या कर्जाची माहिती असते. तर आपल्या देशाने इतर देशात केलेल्या प्रत्यक्ष गुंतवणूकीची माहिती असते. अशा प्रकारे व्यवहारशेषामध्ये एखाद्या देशाने एका वर्षात इतर देशाबरोबर केलेल्या सर्व आर्थिक व्यवहारांच्या जमा-खर्चाची (येण्या-देण्याची) माहिती दर्शविलेली असते. त्यास व्यवहारशेष (Balance of payment) असे म्हणतात.

अनुकूल व्यवहारशेष आणि प्रतिकूल व्यवहारशेष असे व्यवहारशेषाचे प्रमुख दोन प्रकार आहेत. व्यवहारशेषात जेंव्हा देणी रकमेपेक्षा येणी रक्कम जास्त दिसते तेंव्हा त्या देशाचा व्यवहारशेष अनुकूल व्यवहारशेष असतो. आणि व्यवहारशेषात येणी रकमेपेक्षा देणी रक्कम जास्त असते तेंव्हा त्या व्यवहारशेषास प्रतिकूल व्यवहारशेष असे म्हणतात. विकसित देशांचा व्यवहारतोल हा नेहमी अनुकूल असतो. तर अविकसित आणि विकसनशील देशांचा व्यवहारतोल हा प्रतिकूल असतो. कारण या देशांची आयात जास्त असते आणि निर्यात कमी असते. थोडक्यात, आधिक्याच्या व्यवहारतोलास अनुकूल व्यवहारतोल असे म्हणतात. तर तुटीच्या व्यवहारतोलास प्रतिकूल व्यवहारतोल असे म्हणतात. जगातील प्रत्येक देश आपला व्यवहारतोल अनुकूल राहील असे प्रयत्न करत असतो. कारण व्यवहारतोल सतत प्रतिकूल (तुटीचा) असेल तर संबंधित देशाच्या अर्थव्यवस्थेवर त्याचे विपरित परिणाम होत राहतात. भारताचा विचार केला तर सन १९५१ पासून आजतागायत भारताचा व्यवहारशेष तुटीचा (प्रतिकूल) राहिला आहे. कारण १९५१ पासून आपण देशात विकास कार्यक्रम राबवत आहोत. देशात विकासाची प्रक्रिया गतीने सुरू आहे. १९४७ पर्यंत इंग्रजांच्या राजवटीत देश सर्व बाबतीत खूपच मागासलेला होता. म्हणून १९५१ पासून आपण आर्थिक नियोजनाच्या माध्यमातून देशाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याचा प्रयत्न करत आहोत. त्यासाठी विदेशातून लोखंड, सिमेंट, यंत्रसामग्री, रासायनिक खते यांची मोठ्या प्रमाणात दरवर्षी आयात करत आहोत. आयातीपेक्षा आपली निर्यात खूपच कमी असल्याने १९५१ पासून आजअखेर आपला व्यवहारशेष प्रतिकूल

(तुटीचा) राहिला आहे. व्यवहारशेषातील तूट दिवसेंदिवस वाढत आहे. म्हणून व्यहारशेषातील वाढती तूट ही प्रमुख आर्थिक समस्या सरकारसमोर असून अनेक वर्षापासून सरकार या समस्येला तोंड देत आहे. अशा प्रकारे व्यवहारशेष हे समग्रलक्षी अर्थशास्त्रातील प्रमुख आर्थिक चल असून त्याचा अभ्यास समग्रलक्षी अर्थशास्त्रात केला जातो.

**५) विनियम दर (Exchange Rate)**

विनियम दरालाच विदेशी विनिमय दर असेही म्हणतात. प्रत्येक देशाच्या चलनाला दोन मूल्ये असतात. (१) अंतर्गत मूल्य आणि (२) बाह्य मूल्य. अंतर्गत मूल्याचे उदाहरण पुढीलप्रमाणे सांगता येईल. उदाहरणार्थ १०० रूपयास एक छत्री विकत मिळत असेल तर १०० रूपयाचे मूल्य = १ छत्री होय. याला चलनाचे (रूपयाचे) अंतर्गत मूल्य (Internal Value) असे म्हणतात. भारतीय चलन ८० रूपये अमेरिकेला देऊन त्या बदल्यात, अमेरिकेचा १ डॉलर मिळत असेल तर ८० रूपये = १ डॉलर किंवा १ डॉलर = ८० रूपये याला चलनाची किंवा बाह्य रुपयाची किंमत (External value) असे म्हणतात. अशा प्रकारे एका देशाच्या चलनाची किंमत दुसऱ्या देशाच्या चलनात सांगणे म्हणजे विनिमय दर होय. किंवा दोन देशांच्या चलनाची अदला बदल ज्या दराने होते त्या दरास विनिमय दर असे म्हणतात. दर तासाला विनिमय दर बदलत असतो. आणि २४ तासातून एकदा तो जाहीर केला जातो. विनिमय दरात सतत चढ-उतार होत असतात. विनिमय दर स्थिर नसतो. म्हणून विनिमय दरास आर्थिक चल (Economic Variable) असे म्हणतात. १९९८ मध्ये अमेरिकन १ डॉलर = ४२ रूपये असा विनिमय दर होता. २०१४ मध्ये अमेरिकन १ डॉलर = ६०रूपये असा दर होता. २०१९ मध्ये तो १ अमेरिकन डॉलर = ७० रूपये असा होता. या उदाहरणावरून आपल्या असे लक्षात येते की, डॉलरच्या तुलनेत रूपयाची किंमत कमी कमी होत आहे. आणि रूपयाच्या तुलनेत डॉलरचे मूल्य वाढत आहे. चलनाच्या मागणी पुरवठ्याच्या समतोलातून चलनाचे मूल्य ठरत असते. जगात अमेरिकन डॉलरला मागणी खूप मोठी आहे. त्यामुळे डॉलरचे मूल्य सतत वाढत आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात रूपयाला फारशी मागणी नाही. त्यामुळे रूपयाचे मूल्य कमी आहे. एखाद्या देशाच्या चलनाचे मूल्य सतत कमी होत जाणे ही त्या देशाच्या दृष्टीने चांगली बाब नसते. अशा देशाची आंतरराष्ट्रीय पत आणि प्रतिष्ठा कमी होते. चलनाची किंमत कमी झाल्याने निर्यात वाढते. हा एक फायदा होत असला तरी चलनाची किंमत सतत कमी होणे हे चांगले नसते. म्हणून विनिमय दरात फार मोठे चढ-उतार होणार नाहीत याची काळजी सरकारला घ्यावी लागते. जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था सुद्धा विनिमय दर स्थिर राखण्याचा प्रयत्न करत असतात.

सारांश,

अशा प्रकारे रोजगार, राष्ट्रीय उत्पन्न, सर्वसाधारण किंमत पातळी, व्यवहारशेष आणि विदेशी विनिमय दर ही प्रमुख स्थूल आर्थिक चले असून या चलामध्ये किंवा या चलांच्या किंमतीमध्ये सतत कमी जास्त बदल होत असतात. रोजगारात आणि राष्ट्रीय उत्पन्नात सतत वाढ होणे ही देशाच्या दृष्टीने चांगली बाब असते. परंतु सर्वसाधारण किंमत पातळीत मोठी वाढ होणे, व्यवहारशेष प्रतिकूल असणे आणि विदेशी

विनिमय दरात सतत फार मोठे चढ उतार होणे (चलनाची किंमत सतत कमी होत जाणे) या बाबी अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने चांगल्या नसतात. म्हणून सरकारला हस्तक्षेप करून (उपाययोजना करून) किंमत पातळीत फार मोठी वाढ होणार नाही, व्यवहारशेष सतत तुटीचा (प्रतिकूल) राहणार नाही आणि विनिमय दरात मोठे बदल होणार नाहीत (आपल्या चलनाची किंमत सतत ढासळणार नाही) याची काळजी घ्यावी लागते.

## स्थूल आर्थिक उद्दिष्टे (Macro Economic Objectives)

### प्रास्ताविक :-

स्थूल अर्थशास्त्र म्हणजे अर्थव्यवस्थेतील मोठ्या घटकांचा अभ्यास करणारे शास्त्र होय. स्थूल किंवा समग्रलक्षी अर्थशास्त्र हे राष्ट्रीय प्रश्नांचा अभ्यास करते. उदाहरणार्थ बेकारीची समस्या, तेजी-मंदीची समस्या इत्यादी. या समस्या राष्ट्रीय समस्या असून त्या समस्या सोडविण्याची जबाबदारी सरकारची असते. मध्यवर्ती सरकार किंवा केंद्र सरकार विविध आर्थिक धोरणांच्या साहाय्याने या समस्या सोडविण्याचा प्रयत्न करत असते. चलनविषयक धोरण, राजकोषीय धोरण इत्यादी धोरणांच्या साहाय्याने पूर्ण रोजगार प्रस्थापित करण्याचा प्रयत्न सरकार करते. तसेच देशात आर्थिक स्थैर्य प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करते. यानांच समग्रलक्षी आर्थिक उद्दिष्टे असे म्हणतात. ही समग्रलक्षी आर्थिक उद्दिष्टे थोडक्यात खालीलप्रमाणे स्पष्ट केली आहेत.

### (१) आर्थिक स्थैर्य (Economic Stability) :-

तेजी आणि मंदी या व्यापारचक्राच्या प्रमुख दोन अवस्था आहेत. या अवस्था देशात निर्माण झाल्या की आर्थिक स्थैर्य नष्ट होऊन आर्थिक अस्थैर्य निर्माण होते. त्याचा आर्थिक विकासावर प्रतिकूल परिणाम होतो. त्यामुळे देशात आर्थिक अस्थिरता निर्माण होणार नाही याची काळजी सरकारला घ्यावी लागते. तसेच जर देशात आर्थिक अस्थैर्य निर्माण झाले तर तेजी किंवा मंदी नष्ट करून आर्थिक स्थैर्य प्रस्थापित करण्याचे काम सरकारला करावे लागते. तेजीच्या काळात वस्तू व सेवांच्या किंमती अफाट वाढलेल्या असतात. त्यामुळे सर्वसामान्य लोकांचे (गरीब व मध्यमवर्गीयांचे) मोठे आर्थिक नुकसान होते. तसेच देशात मंदीची परिस्थिती उदभवली तर उत्पादक व्यापारी, गुंतवणूकदार यांचे मोठे नुकसान होते मंदीच्या काळात किंमती, उत्पादन, गुंतवणूक आणि नफा यात मोठी घट होते. तेजी आणि मंदी यामुळे आर्थिक स्थैर्य नष्ट होते. तेजी आणि मंदी नष्ट झाल्याशिवाय देशात आर्थिक स्थिरता प्रस्थापित होत नाही. आर्थिक स्थैर्य प्रस्थापित करण्यासाठी देशातील केंद्र सरकार चलनाविषयक आणि राजकोषीय साधनांचा अवलंब करते. आर्थिक स्थैर्य देशात प्रस्थापित झाल्याशिवाय आर्थिक विकासाचा वेग वाढत नाही. म्हणून जगातील प्रत्येक देशाने आर्थिक स्थैर्याच्या उद्दिष्टाला प्राधान्य दिले आहे.

### (२) पूर्ण रोजगार (Full Employment) :-

बेकारीचे निर्मूलन करणे म्हणजे देशात पूर्ण रोजगार प्रस्थापित करणे होय. देशातील सर्व प्रकारची बेकारी नष्ट केल्याशिवाय पूर्ण रोजगार प्रस्थापित होत नाही. उत्पादन घटकांची व उत्पादन साधनांची बेकारी नष्ट करणे म्हणजे पूर्ण रोजगार निर्माण करणे होय. जलद व सर्वसमावेशक विकासासाठी पूर्ण रोजगार

प्रस्थापित करावा लागतो. देशात पूर्ण रोजगार प्रस्थापित करणे हे समग्रलक्षी आर्थिक धोरणाचे महत्वाचे उदिष्ट आहे. पूर्ण रोजगार म्हणजे शून्य टक्के बेकारी नव्हे. देशात जर मोठ्या प्रमाणात बेकारी असेल तर सामाजिक स्वास्थ ढासळते. मनुष्यबळाचा किंवा श्रमशक्तीचा देशाच्या आर्थिक विकासासाठी वापर करून घेता येत नाही. म्हणून बेकारी नष्ट करून पूर्ण रोजगार प्रस्थापित करण्याचे कार्य सरकारला करावे लागते. त्यासाठी सरकारकडून विविध उपाय योजले जातात. उदाहरणार्थ सरकार उद्योगावरील काही जाचक कर काढून टाकण्याचा तसेच करांच्या दरात कपात करण्याचा निर्णय घेते. त्यामुळे उद्योग क्षेत्रात गुंतवणूक वाढून रोजगार वाढतो. तसेच सरकार स्वत: काही नवीन उद्योग काढते. त्यामुळेही रोजगार वाढतो. विविध उद्योगांना अर्थसाहाय्य देण्याचे धोरणही सरकार राबवते. त्यामुळे उद्योजकांना कारखान्याचा विस्तार करण्याची तसेच नवीन कारखाने काढण्याची प्रेरणा मिळते. त्यामुळे रोजगार संधीत मोठी वाढ होते.

### (३) किंमत स्थैर्य (Price Stability) :-

किंमत पातळीत होणारे चढ-उतार रोखणे म्हणजे किंमत स्थैर्य प्रस्थापित करणे होय वस्तू व सेवांच्या किंमतीत फार मोठे चढ उतार होत असतील तर उत्पादक, उपभोक्ते इत्यादी विविध घटकावर त्याचे प्रतिकूल परिणाम होतात. वस्तू व सेवांच्या (उत्पदनाच्या) किंमती खूपच कमी झाल्या तर उत्पादकांचा नफा कमी होतो. त्यांच्यात नैराश्य पसरते. ते गुंतवणूक कमी करतात. त्यामुळे रोजगार, एकूण उत्पादन, राष्ट्रीय उत्पन्न, आर्थिक विकास या घटकावर अत्यंत प्रतिकूल परिणाम होतो. आणि याउलट वस्तू व सेवांच्या किंमतीत फार मोठी वाढ झाली तर भाववाढ किंवा महागाईची परिस्थिती निर्माण होते. त्यामुळे ग्राहकांचा उपभोग कमी होतो. त्यांचा राहणीमानाचा आणि आरोग्याचा दर्जा ढासळतो. अंतिमत: प्रभावी मागून घटून अर्थव्यवस्थेचे नुकसान होते. अशा प्रकारे वस्तू व सेवांच्या किंमतीत फार मोठे चढ-उतार घडून आले तर उत्पादक आणि ग्राहकांचे नुकसान होऊन अंतिमत: अर्थव्यवस्थेचे सुद्धा नुकसान होते. म्हणून जगातील प्रत्येक देशाने किंमत स्थैर्याच्या उद्दिष्टाला प्राधान्य दिले आहे. वस्तू व सेवा यांच्या किंमतीतील चढ-उतार रोखणे म्हणजेच भाववाढ -भावघट रोखणे होय. त्यासाठी सरकार पैशाच्या पुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्याला प्राधान्य देते. भाववाढही होणार नाही आणि भावघटही होणार नाही एवढा पैशाचा पुरवठा मध्यवर्ती बँकेमार्फत अर्थव्यवस्थेत केला जातो. पैशाच्या पुरवठ्याचे योग्य व्यवस्थापन केले तर देशात किंमत स्थैर्य प्रस्थापित होऊन उत्पादक आणि उपभोक्ते या दोन्ही वर्गाचे हित होते.

### (४) बाह्य समतोल (External Balance) :-

व्यवहारतोलातील समतोल टिकवून ठेवणे म्हणजे बाह्य समतोल प्रस्थापित करणे होय. आयात आणि निर्यात हे आंतरराष्ट्रीय व्यापाराचे दोन भाग आहेत. देशाची आयात जर निर्यातीपेक्षा जास्त असेल तर आंतरराष्ट्रीय व्यापार तुटीचा होतो. विदेशी चलनाच्या स्वरूपात कर्ज काढून विदेशांची देणी भागवावी लागतात. त्यामुळे प्रत्येक देश व्यवहारशेषातील समतोल टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करत असतो. एखाद्या देशाच्या व्यवहारशेषात येणी रकमेपेक्षा देणी रक्कम जास्त दिसत असेल तर त्यास प्रतिकूल व्यवहारशेष असे म्हणतात. आणि व्यवहारशेषात देणी रकमेपेक्षा येणी रक्कम जास्त दिसत असेल तर तो व्यवहारशेष अनुकूल असतो. म्हणजे तो देशाला फायदेशीर असतो. ज्या देशाचा व्यवहारशेष प्रतिकूल असेल आणि दरवर्षी सतत प्रतिकूलच असेल तर त्याचा देशाच्या आर्थिक विकासावर अत्यंत विपरित परिणाम होतो.

डॉलरच्या स्वरूपात कर्ज काढून किंवा सोने व इतर मौल्यवान धातू विदेशांना द्यावे लागतात. म्हणून जगातील प्रत्येक देश व्यवहारशेष प्रतिकूल राहणार नाही याची काळजी घेत असतो. आयातीचे प्रमाण कमी करून आणि निर्यातीचे प्रमाण वाढवून आंतरराष्ट्रीय व्यापारातील तूट कमी करता येते आयात कमी करण्यासाठी सरकार आयातीवरील शुल्कात वाढ करणे, आयात वस्तूंचे प्रमाण कमी करणे, काही वस्तूंच्या आयातीस बंदी घालणे इत्यादी उपाय योजते. निर्यातीत वाढ घ्यावी यासाठी सरकार करात व इतर बाबीत सवलती देणे असे उपाय योजते. अशा प्रकारे आंतरराष्ट्रीय व्यापारात सतत तूट राहणार नाही किंवा आंतरराष्ट्रीय व्यापार तोट्याचा होणार नाही, याची काळजी सरकार घेते. व्यवहारशेषातील सर्व प्रकारची येणी-देणी (जमा आणि खर्च) यात फार अंतर राहणार नाही, याची काळजी सरकार घेते.

**(५) आर्थिक वृद्धी (Economic Growth) :-**

देशाच्या आर्थिक वृद्धी दरात प्रतिवर्षी वाढ घडवून आणणे हे प्रत्येक देशाच्या समग्रलक्षी आर्थिक धोरणाचे प्रमुख आणि महत्वाचे उदिष्ट आहे. राष्ट्रीय उत्पन्नात आणि दरडोई उत्पन्नात सतत किंवा नियमित वाढ घडून येणे म्हणजे आर्थिक वृद्धी होय. देशाचा आर्थिक वृद्धीचा किंवा आर्थिक विकासाचा दर जास्त असेल तर देशातील दारिद्र्याचे प्रमाण कमी राहते. आर्थिक विषमता कमी राहते. जागतिक पातळीवर देश स्वावलंबी बनतो. म्हणून आर्थिक विकासाच्या आणि आर्थिक वृद्धीच्या उद्दिष्टाला महत्व प्राप्त झाले आहे. राजकोषीय आणि चलनविषयक साधनांचा योग्य वापर करून सरकार देशाच्या आर्थिक विकासाचा वेग वाढविण्याचा प्रयत्न करत असते.

सारांश:-

अशा प्रकारे आर्थिक स्थैर्य, पूर्ण रोजगार, किंमत स्थैर्य, बाह्य समतोल आणि आर्थिक वृद्धी ही प्रत्येक देशाच्या समग्रलक्षी आर्थिक धोरणाची प्रमुख उद्दिष्टे साध्य करण्याचा प्रयत्न प्रत्येक देश करत असतो.

Module II

# राष्ट्रीय उत्पन्न मोजमापाच्या पद्धती

(Methods of Measurement of National Income)

देशाचा आर्थिक विकास होत आहे किंवा नाही ते पाहण्यासाठी तसेच दोन देशांच्या विकासाची तुलना करण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्नाचे मोजमाप करणे आवश्यक असते. उत्पादन पद्धती, उत्पन्न पद्धती आणि खर्च पद्धती या राष्ट्रीय उत्पन्न मापनाच्या तीन पद्धती असून या पद्धतींचे थोडक्यात स्पष्टीकरण खालीलप्रमाणे दिले आहे.

**(१) उत्पादन पद्धत (Production Method) :-**

उत्पादन पद्धतीनुसार राष्ट्रीय उत्पन्नाचे मोजमाप करताना देशात एका वर्षात उत्पादित झालेल्या वस्तू आणि सेवांचे बाजारातील चालू किंमतीनुसार पैशातील मूल्य विचारात घेतले जाते. अर्थव्यवस्थेची विभागणी प्राथमिक, द्वितीय आणि तृतीय अशा तीन क्षेत्रात झालेली असते. या तिन्ही क्षेत्रात कृषी माल, औद्योगिक माल आणि विविध प्रकारच्या सेवांचे उत्पादन होत असते. या सर्व वस्तू व सेवांचे पैशातील मूल्य म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय. उत्पादन पद्धतीनुसार राष्ट्रीय उत्पन्न काढताना खालील सूत्राचा वापर केला जातो.

| | | |
|---|---|---|
| उत्पादन पद्धतीनुसार राष्ट्रीय उत्पन्न = | अर्थव्यवस्थेच्या सर्व क्षेत्रातील वस्तू व सेवा यांची संख्या | X किंमत |

उत्पादन पद्धतीनुसार राष्ट्रीय उत्पन्नाचे मोजमाप अचूक व निर्दोष व्हावे यासाठी खालील गोष्टींची काळजी घ्यावी लागते. उदाहरणार्थ

(१) उत्पादन पद्धतीनुसार राष्ट्रीय उत्पन्न काढताना फक्त अंतिम वस्तू व सेवा यांचाच विचार केला पाहिजे. त्यामुळे दुहेरी मोजणीचा दोष राहणार नाही.

(२) राष्ट्रीय उत्पन्नातून घसारा किंवा झीज खर्च वजा केला पाहिजे.

(३) आयात वस्तूंचे मूल्य देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नातून वजा केले पाहिजे आणि निर्यात वस्तूंचे मूल्य देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात धरले पाहिजे.

(४) उत्पादन पद्धतीने राष्ट्रीय उत्पन्न मोजताना वस्तूंच्या किंमतीत जे बदल होतात, त्या बदलांचाही विचार केला पाहिजे.

(५) देशात तयार झालेल्या सर्व वस्तू व सेवांची मोजणी केली पाहिजे.

(६) काही भांडवली वस्तू तयार करण्यासाठी काही वर्षे लागतात. म्हणून भांडवली वस्तू ज्या वर्षी तयार झाली असेल किंवा ज्या वर्षी पूर्ण झाली असेल त्याच वर्षात तिचा समावेश करावा.

(७) इतर देशांकडून आपल्या देशास काही येणी (कर्जाचे हप्ते, कर्जावरील व्याज व इतर येणी) मिळाली असतील तर त्यांचा राष्ट्रीय उत्पन्नात समावेश केला पाहिजे. तसेच आपण इतर देशांना काही देणी दिली असतील तर ती राष्ट्रीय उत्पन्नातून वगळली पाहिजेत.

(८) काही वस्तू स्वत:च्या उपभोगासाठी वापरल्या जातात. अशा वस्तूंची किंमत सुद्धा राष्ट्रीय उत्पन्नात धरली पाहिजे.

(९) वस्तूवर जे कर बसवले जातात, त्यांना अप्रत्यक्ष कर असे म्हणतात. अप्रत्यक्ष करांची रक्कम राष्ट्रीय उत्पन्नात धरू नये किंवा मोजू नये.

(१०) काही वस्तू आणि सेवा सरकारी उपभोगासाठी वापरल्या जातात. या वस्तू व सेवा जरी सरकारी उपभोगासाठी असल्या तरी त्यांच्याही किंमतीचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात केला पाहिजे.

(११) बाजार किंमतीनुसार राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करावे.

अशा प्रकारे उत्पादन पद्धतीनुसार राष्ट्रीय उत्पन्नाची मोजणी करताना वरील विविध प्रकारची खबरदारी घेतली पाहिजे. तरच या पद्धतीने राष्ट्रीय उत्पन्नाचे अचूक मापन करणे शक्य होईल.

### (२) उत्पन्न पद्धती (Income Method):–

उत्पन्न पद्धतीनुसार राष्ट्रीय उत्पन्न काढताना देशात एका वर्षाच्या कालखंडात व्यक्ती व संस्था यांना मिळालेल्या निव्वळ उत्पन्नाची बेरीज केली जाते. उत्पादनाच्या प्रक्रियेत भाग घेतल्याबद्दल भूमी, श्रम, भांडवल आणि संयोजन या उत्पादन घटकांना अनुक्रमे खंड, वेतन, व्याज आणि नफा या स्वरूपात मोबदला मिळत असतो. उत्पन्न पद्धतीने राष्ट्रीय उत्पन्न काढताना या मोबदल्यांची बेरीज केली जाते. उत्पन्न पद्धतीनुसार राष्ट्रीय उत्पन्न काढताना खालील सूत्र वापरतात.

| उत्पन्न पद्धतीनुसार राष्ट्रीय उत्पन्न = खंड + वेतन + व्याज + नफा – बदली उत्पन्न |
|---|

देशातील जनतेला आणि विविध संस्थांना एका वर्षाच्या काळात जे निव्वळ उत्पन्न मिळते, त्याची बेरीज करून राष्ट्रीय उत्पन्न काढले जाते. भूमी, श्रम भांडवल आणि संयोजन या उत्पादन घटकांना मिळणाऱ्या खंड, वेतन, व्याज, नफा या मोबदल्यांची बेरीज करून राष्ट्रीय उत्पन्न काढले जाते. म्हणून या उत्पन्नाला घटक खर्चानुसार राष्ट्रीय उत्पन्न असे म्हणतात.

उत्पन्न पद्धतीनुसार राष्ट्रीय उत्पन्नाचे मोजमाप करताना हे मापन अचूक व निर्दोष व्हावे यासाठी खालील गोष्टींची काळजी घेतली पाहिजे.

(१) बदली उत्पन्नाचा (हस्तांतरित/संक्रमित उत्पन्नाचा) समावेश राष्ट्रीय उत्पन्नात करू नये. बेरोजगार भत्ता हे संक्रांत उत्पन्न होय.

(२) एकाच उत्पन्नाची दोन वेळा मोजणी करू नये. द्विगणना टाळावी.

(३) ज्या सेवा विनामूल्य पुरवल्या जातात, अशा विनामूल्य सेवांच्या किंमतींचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात करू नये.

(४) ज्या नयाचे वाटप केले जात नाही अशा अवितरित (न वाटलेल्या) नफ्याचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात करू नये.

(५) आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहारातून जे निव्वळ उत्पन्न प्राप्त होते, त्याचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात करावा. उदाहरणार्थ येणी ४०,००० रूपये, देणी ३०,००० रूपये असतील तर १०,००० निव्वळ मिळकत होय.

(६) उत्पादक स्वत:च्या मालकीची उत्पादन साधने व उत्पादन घटक वस्तू व सेवा निर्माण करण्यासाठी वापरत असतात. त्या उत्पादन घटकांचे मोबदले (बाजारभावानुसार) राष्ट्रीय उत्पन्नात धरले पाहिजेत.

(७) वस्तू व सेवांवर जे कर बसवले जातात, त्या करांचे उत्पन्न राष्ट्रीय उत्पन्नातून वजा केले पाहिजे.

(८) श्रम न करता, उत्पादन न करता मिळालेले उत्पन्न राष्ट्रीय उत्पन्नातून वगळावे.

अशा प्रकारे उत्पन्न पद्धतीनुसार राष्ट्रीय उत्पन्नाची मोजणी करताना वरील विविध प्रकारची दक्षता सरकारने घेतली पाहिजे. तरच राष्ट्रीय उत्पन्न अचूक आणि खरे काढता येईल.

### (३) खर्च पद्धती :- (Expenditure Method)

एका वर्षाच्या कालखंडात देशातील खाजगी खर्च आणि सरकारी खर्च विचारात घेऊन जेंव्हा राष्ट्रीय उत्पन्नाची मोजणी केली जाते, तेंव्हा त्यास खर्चानुसार राष्ट्रीय उत्पन्न असे म्हणतात. खर्च पद्धतीने राष्ट्रीय उत्पन्न मोजताना तीन प्रकारच्या खर्चाचा विचार केला जातो. व्यक्ती व संस्थांनी केलेला खर्च, सरकारने केलेला खर्च आणि खाजगी व सार्वजनिक क्षेत्राने गुंतवणूकीवर केलेला खर्च. या सर्व खर्चाची बेरीज करून राष्ट्रीय उत्पन्नाची मोजणी केली जाते. खर्च पद्धतीनुसार राष्ट्रीय उत्पन्न काढताना खालील सूत्राचा अवलंब केला जातो.

| खर्च पद्धतीनुसार राष्ट्रीय उत्पन्न = उपभोग खर्च + गुंतवणूक खर्च + सरकारी खर्च + आयात निर्यात मूल्य |
|---|

अशा प्रकारे खर्च पद्धतीनुसार राष्ट्रीय उत्पन्न काढताना खाजगी खर्च आणि सरकारी खर्च यांची बेरीज केली जाते. खर्च पद्धतीनुसार राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना खालील दक्षता किंवा खबरदारी घेतली पाहिजे.

(१) या पद्धतीने राष्ट्रीय उत्पन्न काढताना आयात-निर्यात मूल्याचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात केला पाहिजे.

(२) राष्ट्रीय उत्पन्नातून करांची रक्कम वजा केली पाहिजे.

(३) देशातील विविध घटकांकडून (व्यक्ती, संस्था इ.) जो खर्च केला जातो, त्याची खरी आणि पुरेशी माहिती गोळा केली पाहिजे.

(४) वस्तूची दुहेरी मोजणी टाळली पाहिजे. अंतिम वस्तूंचाच विचार केला पाहिजे.

(५) वस्तूवरील करांची रक्कम राष्ट्रीय उत्पन्नातून वजा केली पाहिजे.

(६) राष्ट्रीय उत्पन्न मोजताना देशात जेवढी नवीन भांडवली गुंतवणूक झाली असेल तेवढी गुंतवणूक विचारात घेतली पाहिजे.

खर्च पद्धतीनुसार राष्ट्रीय उत्पन्न मोजताना काही अडचणी येतात. उदाहरणार्थ बहुतेक लोक व संस्था त्यांनी केलेल्या खर्चाची खरी माहिती देत नाहीत. त्यामुळे खर्च पद्धतीचा फारसा वापर केला जात नाही. उत्पादन पद्धत आणि उत्पन्न पद्धतीचा वापर करून राष्ट्रीय उत्पन्नाची मोजणी केली जाते. काही देशात उत्पादन पद्धतीचा अवलंब केला जातो. तर काही देश केवळ उत्पन्न पद्धतीचा अवलंब करतात. भारतासारख्या देशात राष्ट्रीय उत्पन्न मोजताना दोन्ही पद्धतींचा एकाचवेळी अवलंब केला जातो.

## राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीचे महत्व (Importance of National Income Data) किंवा राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीचे उपयोजन (Application of National Income Data)

**प्रास्ताविक :–**

जगातील प्रत्येक देश राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करत असतो. दरवर्षी राष्ट्रीय उत्पन्नाची मोजणी केली जाते. राष्ट्रीय उत्पन्नाच्या एका किंवा एका पेक्षा जास्त पद्धतींचा वापर करून राष्ट्रीय उत्पन्नाची गणना केली जाते. खालील कारणासाठी राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन केले जाते. त्यालाच राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारींचे महत्व किंवा राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीचे उपयोजन असे म्हणतात. राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीचे किंवा मोजमापाचे काही फायदे थोडक्यात खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहे.

**(१) आर्थिक विकासाचे मापन करण्यासाठी उपयुक्त :–**

जगातील प्रत्येक देश दरवर्षी आर्थिक विकासाचे मापन करत असतो. त्यासाठी वास्तव राष्ट्रीय उत्पन्नाचा आधार घेतला जातो. कारण राष्ट्रीय उत्पन्न हे राष्ट्राच्या आर्थिक विकासाच्या मोजमापाचे प्रमुख साधन आहे. आर्थिक विकास हा देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नावर अवलंबून असतो. अशा प्रकारे आर्थिक विकासाचे मापन करण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्न ही संकल्पना अत्यंत उपयुक्त आहे.

**(२) आर्थिक विकासाची काळानुसार तुलना करण्यासाठी उपयुक्त :–**

राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीचा आणखी एक फायदा म्हणजे राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीच्या साहाय्याने विविध वर्षात किंवा विविध कालखंडात देशाचा आर्थिक विकास कितपत झाला आहे ते आपण सांगू शकतो. अश्या प्रकारे एखाद्या राष्ट्राचा मागील वर्षीच्या तुलनेत यावर्षी किती विकास झाला आहे ते सांगता येते. कारण दरवर्षी राष्ट्रीय उत्पन्नाची गणना केली जाते. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीवरून गतवर्षीच्या तुलनेत या वर्षी राष्ट्रीय उत्पन्नात किती वाढ झाली? राष्ट्रीय उत्पन्नात वाढ झाली की घट झाली हे समजते. त्यावरून मागील वर्षीच्या तुलनेत या वर्षी देशाचा आर्थिक विकास घडून आला किंवा नाही. ते समजते तसेच दशकानुसार राष्ट्रीय उतपन्नाची मांडणी करता येते. त्यावरून प्रत्येक दशकातील राष्ट्रीय उत्पन्नाची आकडेवारी मांडून मागील दशकाच्या तुलनेत (मागील दहा वर्षाच्या तुलनेत) या दशकात राष्ट्रीय उत्पन्नात किती टक्के वाढ झाली ते सांगता येते. अशा प्रकारे कोणत्याही एका देशाला मागील वर्षीच्या तुलनेत या वर्षी किती आर्थिक विकास झाला? हे जाणून घेण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीचा उपयोग होतो. गतवर्षीच्या किंवा मागील दशकाच्या तुलनेत या वर्षी किंवा या दशकात वास्तव राष्ट्रीय उत्पन्न वाढत असेल तर याचा अर्थ मागील काळाच्या तुलनेत या वर्षी या काळात देशाचा आर्थिक विकास घडून आला आहे किंवा आर्थिक विकासात वाढ घडून आली आहे, असा निष्कर्ष काढता येतो. याउलट गतवर्षीच्या तुलनेत या वर्षी राष्ट्रीय उत्पन्न घटले असेल तर याचा अर्थ देशाच्या आर्थिक विकास दरात घट झाली असा निष्कर्ष निघतो. थोडक्यात राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीवरुन दोन कालखंडाच्या तुलनेत

देशाचा कितपत विकास झाला आहे, ते समजते. म्हणून राष्ट्रीय उत्पन्नाचे मोजमाप करून आकडेवारी गोळा करणे अत्यंत उपयुक्त असते.

**(३) विकासाची प्रादेशिक तुलना करण्यासाठी उपयुक्त :-**

राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीवरून ज्याप्रमाणे संपूर्ण देशाच्या आर्थिक विकासाची कल्पना येते, त्याप्रमाणे देशात जे विविध प्रांत किंवा प्रदेश असतात, जी घटक राज्ये असतात त्यांचा कितपत विकास झाला आहे? ते जाणून घेण्यासाठी सुद्‌धा राष्ट्रीय उत्पन्नाची संकल्पना उपयोगी पडते. उदाहरणार्थ भारतात २९ राज्ये (States) आहेत. यापैकी कोणती राज्ये प्रगत आहेत? कोणती राज्ये मागासलेली आहेत? हे जाणून घेण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्नाची आकडेवारी उपयुक्त ठरते. तसेच राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीवरून कोणत्या राज्यांच्या विकासाचा दर जास्त आहे? आणि कोणत्या राज्यांच्या विकासाचा दर कमी आहे? याचीही माहिती मिळू शकते. तसेच एकाच राज्यातील विविध प्रादेशिक विभागांचा, विविध जिल्ह्यांचा, विविध तालुक्यांचा, तालुक्यातील विविध गावांचा कितपत विकास झाला आहे? आणि विकासाचा दर काय आहे? विकास वाढत्या वेगाने होत आहे की घटत्या दराने याचीही माहिती राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीवरुन होते. उदाहरणार्थ महाराष्ट्रात पश्चिम महाराष्ट्र, कोकण, विदर्भ, मराठवाडा असे प्रादेशिक विभाग आहेत. यापैकी कोणत्या प्रदेशांचा किती व कसा विकास झाला आहे? विकास होत आहे की नाही? याची माहिती आपणास राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीवरून मिळते. हे राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीचे महत्व आहे.

**(४) विविध राष्ट्रांच्या आर्थिक विकासाची तुलना करण्यासाठी उपयुक्त :-**

राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीचा आणखी एक फायदा म्हणजे राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीवरून जगातील विविध राष्ट्रांच्या आर्थिक विकासाची तुलना करता येते. जगातील प्रत्येक देश राष्ट्रीय उत्पन्नाची मोजणी करत असतो. तसेच जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या संस्था सभासद राष्ट्रांच्या राष्ट्रीय उत्पन्नाची आकडेवारी गोळा करत असतात. अमेरिकन डॉलरला आंतरराष्ट्रीय चलन (सर्वमान्य चलन) म्हणून मान्यता मिळाली असल्याने जगातील सर्व देशांचे राष्ट्रीय उत्पन्न डॉलरमध्ये सांगितले जाते. त्यामुळे कोणत्या देशाचे राष्ट्रीय उत्पन्न जास्त आहे? आणि कोणत्या देशाचे राष्ट्रीय उत्पन्न कमी आहे? हे आपणास समजते. आर्थिक विकासाच्या बाबतीत आपला देश जगात कुठे आहे? किंवा कितव्या स्थानावर आहे? ते राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीवरून समजते. जगातील इतर देशांच्या तुलनेत आपल्या देशाचा आर्थिक विकास कितपत झाला आहे? ते राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीवरून समजते. इतर देशांच्या तुलनेत आणि विकासात आपण पुढे आहोत की मागे आहोत ते समजते. थोडक्यात, आपल्या देशाच्या आर्थिक विकासाची इतर देशांच्या विकासाची तुलना करण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीचा उपयोग होतो.

**(५) जागतिक अर्थव्यवस्थेचे प्रकार किंवा वर्गीकरण तयार करण्यासाठी उपयुक्त :-**

जगातील सर्व देशांच्या राष्ट्रीय उत्पन्नाची आकडेवारी उपलब्ध असते. त्या आकडेवारीवरून जगातील अर्थव्यवस्थांचे विकसित अर्थव्यवस्था, अविकसित अर्थव्यवस्था आणि विकसनशील अर्थव्यवस्था अशा तीन प्रकारात वर्गीकरण करता येते. तसेच राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीवरून उच्च उत्पन्न गटातील देश, मध्यम उत्पन्न गटातील देश, कमी उत्पन्न गटातील देश असे देशांचे आर्थिक वर्गीकरण करता येते. राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीवरून आपला देश उच्च उत्पन्न गटात मोडतो की मध्यम उत्पन्न गटात मोडतो

की कमी उत्पन्न गटात मोडतो? ते समजते. थोडक्यात, जगातील विविध देशांच्या अर्थव्यवस्थांचे वर्गीकरण करण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीचा उपयोग होतो.

**(६) अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांची प्रगती समजण्यास उपयुक्त :-**

कोणत्याही देशाची अर्थव्यवस्था ही (१) प्राथमिक क्षेत्र (कृषी क्षेत्र) (२) द्वितीय क्षेत्र (औद्योगिक क्षेत्र) आणि (३) तृतीय क्षेत्र (व्यापार व सेवा क्षेत्र) या तीन क्षेत्रात विभागलेली असते. या तिन्ही क्षेत्रातून राष्ट्रीय उत्पन्नात भर पडत असते. म्हणजे या तीन क्षेत्रात राष्ट्रीय उत्पन्नाची निर्मिती होत असते. राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीवरून कोणत्या क्षेत्रापासून राष्ट्रीय उत्पन्नात किती भर पडली? ते समजते. अर्थव्यवस्थेचे कोणते क्षेत्र प्रगत आहे? कोणते क्षेत्र अप्रगत आहे? ते समजते. ज्या क्षेत्रापासून राष्ट्रीय उत्पन्नात कमी भर पडते ते क्षेत्र इतर क्षेत्रांच्या तुलनेत किती मागे आहे ते समजते. अशा प्रकारे राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीवरून अर्थव्यवस्थेच्या कोणत्या क्षेत्राची प्रगती झाली आहे? कोणत्या क्षेत्राची प्रगती झाली नाही? किंवा प्रगती झाली असेल तर ती कितपत झाली आहे? याची माहिती मिळते. म्हणून राष्ट्रीय उत्पन्नाची आकडेवारी अत्यंत उपयुक्त आहे.

**(७) आर्थिक नियोजनाची आखणी करण्यास उपयुक्त :-**

राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीचा आणखी एक फायदा म्हणजे या आकडेवारीच्या साहाय्याने देशाचे आर्थिक नियोजन तयार करता येते. आर्थिक नियोजनाची आखणी व अंमलबजावणी करण्यासाठी, आर्थिक नियोजनाची उदिष्ट्ये साध्य करण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीचा उपयोग होतो. देशाच्या सर्वांगीण आर्थिक विकासासाठी, दारिद्र्य, बेकारी, विषमता निर्मूलनासाठी केंद्रीय सत्तेने जाणीवपूर्वक, काळजीपूर्वक घेतलेले आर्थिक निर्णय म्हणजे आर्थिक नियोजन किंवा नियोजन होय. शेतीचा औद्योगिक क्षेत्राचा विकास दर वाढवणे ही नियोजनाची प्रमुख उद्दिष्टे असतात. आर्थिक नियोजनाची उद्दिष्टे साकार करण्यासाठी, नियोजन यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीचा आधार घ्यावा लागतो. राष्ट्रीय उत्पन्नात कशा प्रकारे वृद्धी घडून येत आहे? त्याचा विचार करून सरकार नियोजनाची आखणी करते किंवा उद्दिष्टे ठरवते.

**(८) नियोजनाचे यशापयश पाहण्यासाठी उपयुक्त :-**

आर्थिक नियोजन यशस्वी झाले आहे की नाही हे पाहण्यासाठी सुद्धा राष्ट्रीय उत्पन्न ही संकल्पना उपयोगी पडते. आर्थिक विकास दरात वृद्धी घडवून आणणे हे नियोजनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. नियोजनाच्या (त्रैवार्षिक किंवा पंचवार्षिक योजनांच्या) अंमलबजावणीनंतर राष्ट्रीय उत्पन्नात किती भर पडली, त्यावरून नियोजन यशस्वी झाले की नाही? आर्थिक विकास झाला की नाही? ते ठरवता येते. म्हणून राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीचे संकलन अत्यंत आवश्यक असते.

**(९) देशातील लोकांचे आर्थिक कल्याण मोजण्यासाठी उपयुक्त :-**

राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीच्या आधारे देशातील लोकांचे आर्थिक कल्याण झाले आहे की नाही? झाले असेल तर कितपत झाले आहे? आर्थिक कल्याणात वाढ झाली आहे की घट झाली आहे? ते समजते? आर्थिक कल्याण आणि उत्पादन यांच्यात धन संहसंबंध असतात. उत्पादनात वाढ घडून आली की लोकांच्या आर्थिक कल्याणात वाढ होते. याउलट उत्पादनात घट घडून आली की लोकांचे आर्थिक

कल्याण कमी होते. देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडून येणे म्हणजे आर्थिक कल्याणात वाढ घडून येणे होय. वस्तू व सेवांच्या उत्पादनात वाढ झाली की राष्ट्रीय उत्पन्न वाढते. कारण उत्पादनाची पैशातील किंमत म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय. उत्पादनात वाढ झाल्यास लोकांना जास्तीत जास्त वस्तू उपभोगावयास मिळतात. त्यामुळे लोकांच्या आर्थिक कल्याणात वाढ होते. याऊलट राष्ट्रीय उत्पन्नात घट घडून आली असेल तर लोकांचे आर्थिक कल्याणही कमी झाले आहे, असा निष्कर्ष निघतो. अशा प्रकार देशातील जनतेच्या आर्थिक कल्याणाचे मोजमाप करण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीचा उपयोग होतो.

**(१०) दरडोई उत्पन्न समजण्यासाठी उपयुक्त :-**

राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीचा आणखी एक फायदा म्हणजे राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीवरून दरडोई उत्पन्न आपणास समजते. दरडोई उत्पन्न काढण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्नाची आकडेवारी आवश्यक असते. राष्ट्रीय उत्पन्नाला देशाच्या लोकसंख्येने भागले असता दरडोई उत्पन्न निघते. दरडोई उत्पन्न वाढत आहे की कमी होत आहे? वाढत असेल तर वाढीचा दर काय आहे? हे पाहण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीचा उपयोग होतो.

**(११) राष्ट्रीय उत्पन्नाचे वितरण किंवा वाटप समजण्यास उपयुक्त :-**

भूमी, श्रम, भांडवल आणि संयोजन हे उत्पादनाचे घटक राष्ट्रीय उत्पन्नाची (वस्तू व सेवांची) निर्मिती करत असतात. म्हणून खंड, वेतन, व्याज आणि नफा या स्वरूपात या उत्पादन घटकांच्या मालकामध्ये राष्ट्रीय उत्पन्नाचे वाटप किंवा वितरण होत असते. उत्पादन जितके महत्वाचे असते तितकेच उत्पादनाचे वाटप सुद्‌धा महत्वाचे असते. राष्ट्रीय उत्पन्नाचे वाटप योग्य किंवा न्याय होणे आवश्यक असते. राष्ट्रीय उत्पन्नाचे वाटप देशात कशा प्रकारे झाले आहे? उत्पादन घटकांना राष्ट्रीय उत्पन्नाचा वाटा योग्य प्रमाणात मिळाला आहे की नाही? ते राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीवरून समजते.

**(१२) अर्थव्यवस्थेचे नियमन करण्यास उपयुक्त :-**

सरकारला अर्थव्यवस्थेचे योग्य प्रकारे नियमन करावे लागते. अर्थव्यवस्थेचे कामकाज व्यवस्थित चालावे यासाठी लक्ष द्यावे लागते. अर्थव्यवस्थेचे नियमन करण्यासाठी, अर्थव्यवस्थेला योग्य दिशा देण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीचा उपयोग होतो. राष्ट्रीय उत्पन्नाच्या सांख्यिकी माहितीवरून देशातील एकूण उत्पादन, बचत, गुंतवणूक, उत्पन्नाचे वाटप, उपभोग किंवा मागणी, विविध क्षेत्रांची प्रगती समजते. त्यानुसार सरकारला चलनविषयक व राज्यवित्तीय धोरणे आखता येतात व राबवता येतात. राष्ट्रीय उत्पन्नाचे वितरण अयोग्य झाले असेल तर उपाय योजता येतात. अर्थव्यवस्थेतील एखादे क्षेत्र अप्रगत राहिले असेल तर त्याच्या प्रगतीसाठी उपाय योजता येतात. अशा प्रकारे विविध प्रकारच्या उपाय योजना करण्यासाठी म्हणजेच अर्थव्यवस्थेचे नियमन करण्यासाठी, अर्थव्यवस्थेला शिस्त लावण्यासाठी आणि योग्य दिशा देण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीचा उपयोग होतो.

सारांश

अशा प्रकारे राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीवरून आपणास देशाचा आर्थिक विकास मोजता येतो. देशाचा विकास कितपत झाला आहे? ते समजून घेता येते. जागतिक पातळीवर आपले काय स्थान आहे? ते अजमावता येते. लोकांचे राहणीमान समजते. मानव विकासाचा निर्देशांक राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीवरून काढता येतो. अर्थव्यवस्थेच्या कोणत्या क्षेत्राची किती प्रगती झाली आहे ते समजते. तसेच आर्थिक धोरणे

व राजकोषीय धोरणे आखण्यासाठी सुद्धा राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीचा उपयोग होतो. अर्थशास्त्राचे विद्यार्थी आणि अर्थशास्त्राचे अभ्यासक किंवा अर्थतज्ञ यांना अभ्यासासाठी राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीचा उपयोग होतो.

## राष्ट्रीय उत्पन्नाचे मोजमाप करताना येणाऱ्या अडचणी

(Difficulties in the Measurement of National Income)

**प्रास्ताविक :-**

उत्पादन पध्दत, उत्पन्न पध्दत आणि खर्च पद्धत या तीन पद्धतींच्या साहाय्याने राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन केले जाते. राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीचा सरकारला, अभ्यासकांना उपयोग होतो. राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीचे अनेक उपयोग आहेत. त्यासाठी राष्ट्रीय उत्पन्नाची आकडेवारी गोळा केली जाते किंवा राष्ट्रीय उत्पन्नाचे मोजमाप केले जाते. असे असले तरी राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करताना काही अडचणी येतात. या अडचणी प्रामुख्याने तात्विक आणि व्यावहारिक स्वरूपाच्या आहेत. या अडचणींचे थोडक्यात स्पष्टीकरण खालीलप्रमाणे दिले आहे.

### (१) 'राष्ट्र' संकल्पनेची व्याख्या ठरविण्यातील अडचणी

एका देशाचा किंवा एका राष्ट्राचा विचार करून राष्ट्रीय उत्पन्नाची मोजणी केली जाते. प्रत्येक देशाची एक भौगोलिक सीमारेषा ठरलेली असते. उदाहरणार्थ भारताची भौगोलिक सीमा रेषा काश्मीर ते कन्याकुमारी अशी आहे. या भौगोलिक सीमारेषेच्या आत देशातील नागरीकांनी तयार केलेल्या वस्तू व सेवांची पैशातील किंमत म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय. परंतु राष्ट्रीय उत्पन्नात कोणाच्या व कोणत्या उत्पन्नाचा समावेश करावयाचा? हा प्रश्न निर्माण होतो. आपल्या राष्ट्रातील नागरिक विदेशात राहून उत्पन्न मिळवतात. त्या उत्पन्नाचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात करायचा का? हा प्रश्न निर्माण होतो. कारण तसे केले तर राष्ट्राची जी व्याख्या आहे, त्या व्याख्येला अर्थ उरत नाही. कारण आपल्या देशाच्या हद्दी बाहेर (सीमारेषेच्या बाहेर) असणाऱ्या देशात आपले नागरिक जे उत्पन्न मिळवतात, त्याचा समावेश राष्ट्रीय उत्पान्नात करता येणार नाही. म्हणून 'राष्ट्र' या शब्दाचा वापर कसा करायचा? हा प्रश्न निर्माण होतो. कारण राष्ट्रीय उत्पन्नात राष्ट्राच्या बाहेर मिळालेले उत्पन्न धरता येणार नाही.

### (२) राष्ट्रीय उत्पन्नाची अचूक व्याख्या ठरविणे कठीण :-

राष्ट्रीय उत्पन्नाचे अचूक मापन करण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्नाची निर्दोष व्याख्या ठरविणे आवश्यक आहे. परंतु विविध अर्थशास्त्रज्ञांनी राष्ट्रीय उत्पन्नाच्या ज्या विविध व्याख्या दिल्या आहेत, त्यात एकसारखेपणा नाही. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नाचे मोजमाप करताना राष्ट्रीय उत्पन्नाची कोणती व्याख्या विचारात घ्यायची? असा प्रश्न निर्माण होतो.

### (३) मोजमापाची योग्य पद्धत ठरवणे कठीण :-

उत्पादन पद्धत, उत्पन्न पद्धत आणि खर्च पद्धत या तीन पद्धती राष्ट्रीय उत्पन्नाचे मोजमाप करण्यासाठी वापरल्या जातात. परंतु या तीन पद्धतीपैकी कोणत्या पद्धतीने राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करावयाचे? ही समस्या सरकारसमोर असते. काही देशात तर, राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करण्यासाठी एकाच वेळी उत्पादन पद्धत आणि उत्पन्न पद्धत अशा दोन्ही पद्धतींचा अवलंब केला जातो.

**(४) दुहेरी मोजणीची शक्यता :-**

राष्ट्रीय उत्पन्नाचा अचूक अंदाज येण्यासाठी वस्तू व सेवांची एकदाच मोजणी झाली पाहिजे. उदाहरणार्थ कापसापासून कापड तयार केले जाते. म्हणून कापसाचे उत्पादन न मोजता कापडाचे उत्पादन मोजले पाहिजे. कापसाचेही उत्पादन मोजले आणि कापडाचेही उत्पादन मोजले तर राष्ट्रीय उत्पन्नाचा आकडा मोठा आणि चुकीचा येईल. म्हणून राष्ट्रीय उत्पन्नाचे मोजमाप करताना अंतिम वस्तूच विचारात घेतल्या पाहिजेत. परंतु हे काही वेळा शक्य होत नाही. काही वेळा कापसासारख्या प्राथमिक वस्तूंचीही मोजणी केली जाते आणि कापडासारख्या अंतिम वस्तूही मोजल्या जातात. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नाचा निश्चित अंदाज येत नाही. ही राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना येणारी एक अडचण आहे.

**(५) कायद्याची मान्यता नसलेले व्यवसाय :-**

काही व्यवसायांना सरकारची (कायद्याची) मान्यता नसते. उदाहरणार्थ भारतासारख्या देशात अनेक वाड्या वस्त्यावर दारूच्या भट्ट्या आढळून येतात. जुगाराचे अड्डे आढळून येतात. दारूचे अड्डे, जुगाराचे अड्डे, वेशाव्यवसाय इत्यादी बेकायदेशीर व्यवसायात अनेक लोक गुंतलेले असतात. या व्यवसायातून त्यांना उत्पन्न मिळत असते. परंतु अशा बेकायदेशीर व्यवसायातून जे उत्पन्न मिळते. त्या उत्पन्नाचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात केला जात नाही. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्न कमी भरते.

**(६) विनामूल्य सेवा :-**

काही सेवा समाजात विनामूल्य पुरविल्या जातात. समाजकार्याच्या उद्देशाने सामाजिक जाणिवेतून सेवाभावी वृत्तीने अशा सेवा पुरविल्या जातात. परंतु या सेवा नि:शुल्क किंवा विनामूल्य असल्याने त्यांच्या किंमतींचा (मूल्यांचा) समावेश राष्ट्रीय उत्पन्नात केला जात नाही. एखाद्याने छंद म्हणून तयार केलेले धातूशिल्प किंवा काष्ठशिल्प, आई आपल्या मुलांचे करत असलेले संगोपन किंवा पालनपोषण, स्वत:च्या बागेत केलेले श्रम, गृहीणीकडून घरी केले जाणारे श्रम (स्वयंपाक करणे, कपडे धुणे, भांडी घासणे, फरशी पुसणे इत्यादी) या कामांचे मूल्य राष्ट्रीय उत्पन्नात धरले जात नाही. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्न कमी भरते. गृहीणींनी घरची कामे मोलकरणीकडून केली, बागकाम मजुराकडून केले तर त्यांना मोबदला (पैसे) द्यावा लागतो. त्याचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात केला जातो. परंतु ज्या सेवा विनामूल्य पुरवल्या जातात त्या सेवांचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात केला जात नाही.

**(७) सार्वजनिक सेवा :-**

आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा या सेवा सरकारकडून पुरवल्या जातात. या सेवांना सार्वजनिक सेवा असे म्हणतात. परंतु राष्ट्रीय उत्पन्नाचे मोजमाप करताना या सेवांचे मूल्य कसे मोजावयाचे? ही समस्या निर्माण होते.

**(८) राष्ट्रीय उत्पन्न ही प्रवाही संकल्पना :-**

राष्ट्रीय उत्पन्न ही साठा (Stock) संकल्पना नसून प्रवाह (Flow) संकल्पना आहे. राष्ट्रीय उत्पन्नात सतत बदल होत असतो. कारण देशात सतत वस्तू व सेवा निर्माण होत असतात. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नाचे काटेकोर मापन करता येत नाही. राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना अडचणी येतात.

**(९) हस्तांतरित उत्पन्न :**

हस्तांतरित उत्पन्नास विनाकष्ट मिळालेले उत्पन्न असे म्हणतात. या उत्पन्नात बेरोजगार भत्ता, निवृत्ती वेतन इत्यादी उत्पन्नाचा समावेश होतो. या उत्पन्नाचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात करावा की करू नये असा प्रश्न निर्माण होतो.

**(१०) जुन्या वस्तूंची खरेदी-विक्री :-**

नव्या वस्तू आणि जुन्या वस्तू विक्रीसाठी बाजारात येत असतात. काही वस्तू जुन्या असतात. त्यांचीही खरेदी-विक्री होत असते. जुनी वस्तू दोनदा विकली जाते. राष्ट्रीय उत्पन्न मोजताना ही एक अडचण निर्माण होते.

**(११) व्यावसायिक विभागणी :-**

देशातील उत्पादक लोकसंख्या प्राथमिक, द्वितीय आणि तृतीय क्षेत्रात काम करत असते. त्याला लोकसंख्येची व्यावसायिक विभागणी असे म्हणतात. परंतु काही लोक शेतीतही काम करत असतात आणि काही काळ उद्योग किंवा सेवा क्षेत्रातही काम करत असतात. त्यामुळे कोणत्या क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नात किती वाटा? हे नेमके ठरवता येत नाही. लोकसंख्येची व्यावसायिक विभागणी काटेकोर झाली नसेल तर कोणत्या क्षेत्रापासून राष्ट्रीय उत्पन्नात किती भर पडली? हे अचूक सांगता येत नाही.

**(१२) वस्तूंच्या उत्पादनासाठी लागणारा दीर्घ कालावधी :-**

काही वस्तू व सेवा अशा असतात की, त्यांच्या उत्पादनासाठी दीर्घ कालावधी लागतो. वस्तू व सेवा एका वर्षात तयार होत नाहीत. विमान, जहाज, रेल्वे, उपग्रह, धरण आणि संरक्षण साहित्य तयार होण्यासाठी काही वर्षे लागतात. राष्ट्रीय उत्पन्न एक वर्षाचा कालावधी विचारात घेऊन मोजले जाते. मग ज्या वस्तू व सेवा तयार होण्यासाठी एक वर्षपेक्षा अधिक वर्षे लागतात, त्या वस्तू व सेवांचे मूल्य कोणत्या वर्षात विचारात घ्यायचे? हा प्रश्न निर्माण होतो. ती वस्तू व सेवा ज्या वर्षात पूर्ण झाली आहे, त्या वर्षीच्या राष्ट्रीय उत्पन्नात तिचे मूल्य विचारात घ्यायचे की ती वस्तू तयार करण्यासाठी जेवढी वर्षे लागली असतील त्या प्रत्येक वर्षात त्या वस्तूचे मूल्य विभागून राष्ट्रीय उत्पन्न मोजायचे? असा प्रश्न निर्माण होतो. जरी एखाद्या वस्तू किंवा सेवेला तयार होण्यास अनेक वर्षे लागली असली तरी ती वस्तू व सेवा ज्या वर्षात पूर्ण झाली असेल, तयार झाली असेल त्या वर्षाच्या राष्ट्रीय उत्पन्नात तिचा समावेश केला पाहिजे.

**(१३) आकडेवारीचा अभाव :-**

राष्ट्रीय उत्पन्नाचे मोजमाप करताना अविकसित व विकसनशील देशात जाणवणारी मोठी अडचण म्हणजे अशा देशात काही कारणामुळे राष्ट्रीय उत्पन्नाची पुरेशी, खरी अचूक व विश्वसनीय आकडेवारी मिळत नाही. निरक्षरता, अल्पशिक्षितपणा, खरी माहिती न देण्याची वृत्ती या कारणामुळे विकसनशील देशात राष्ट्रीय उत्पन्न गोळा करण्यात अडचणी येतात. भारतासारख्या अनेक देशात निरक्षरांचे आणि अल्पशिक्षितांचे प्रमाण मोठे आहे. शेतकरी, स्वयंरोजगारात गुंतलेले यांच्यात निरक्षरांचे प्रमाण जास्त आहे. त्यांच्याकडून विश्वसनीय माहिती मिळत नाही. त्यामुळे अचूक राष्ट्रीय उत्पन्न काढणे कठीण होते.

**(१४) वस्तुविनिमयाची अडचण :-**

एका वस्तूच्या बदल्यात जेंव्हा दुसरी वस्तू दिली जाते तेंव्हा त्यास वस्तुविनिमय पद्धत किंवा वस्तुविनिमयाचे व्यवहार असे म्हणतात. वस्तुविनिमयाचे व्यवहार पैशात होत नाहीत. परंतु राष्ट्रीय उत्पन्न मात्र पैशात मोजले जाते. म्हणून ज्या देशात अद्यापही वस्तुविनिमय पद्धत अस्तित्वात आहे, त्या देशात राष्ट्रीय उत्पन्न काढताना अडचणी निर्माण होतात. पैशाचा वापर न करता व्यवहार होणाऱ्या वस्तू व सेवांचे मूल्य कसे ठरवायचे? ही अडचण निर्माण होते.

**(१५) अतिमहत्वाच्या सेवा :-**

सरकारकडून पुरवल्या जाणाऱ्या काही सेवा अत्यंत महत्वाच्या किंवा राष्ट्राच्या दृष्टीने गरजेच्या असतात. उदाहरणार्थ पोलीस सेवा, मिलिटरी किंवा लष्करी सेवा यांचे मूल्य कसे ठरवायचे? हा प्रश्न निर्माण होतो. अशांतता, दंगल व युद्धाच्या काळात पोलीस आणि लष्कर (सैन्य) मोठी व महत्वाची भूमिका व जबाबदारी पार पाडत असते. परंतु शांततेच्या काळात पोलीस, सैनिकावर फारशी जबाबदारी नसते. त्यामुळे त्यांच्या सेवांचे मूल्य किती व कसे ठरवायचे? हा प्रश्न निर्माण होतो.

**(१६) बाजारात न येणाऱ्या वस्तू (Non market transactions) :-**

काही वस्तू व सेवा विक्रीसाठी बाजारात येत नाहीत, त्या उत्पादित होतात व त्यांचा उपभोग सुद्धा घेतला जातो. परंतु त्यांचे मूल्य राष्ट्रीय उत्पन्नात धरले जात नाही. उदाहरणार्थ काही लोक स्वत:ला लागणारा भाजीपाला, फळे, मिरच्या स्वत: उत्पादन करतात व त्याचा उपभोग घेतात. या वस्तू विक्रीसाठी बाजारात येत नाहीत. त्यामुळे या वस्तूंचा आणि त्यांच्या मूल्याचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात केला जात नाही.

सारांश,

अशा प्रकारे राष्ट्रीय उत्पन्नाचे मोजमाप करताना वरीलप्रमाणे काही तात्विक आणि व्यावहारिक अडचणी उद्भवतात. असे असले तरी या अडचणीवर मात करून जगातील प्रत्येक देश राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करत असतो. कारण राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन केल्याशिवाय देशाचा आर्थिक विकास कितपत झाला आहे, ते समजत नाही. म्हणून राष्ट्रीय उत्पन्नाची आकडेवारी सरकारला गोळा करावीच लागते.

Module III

# पैशाच्या मूल्याचा चलनसंख्यामान सिध्दांत

## (Quantity Theory of Money)

**प्रास्ताविक**

वस्तू व सेवा यांचे मूल्य मोजण्याचे कार्य पैसा करतो. प्रा. काऊथर यांच्या मते, पैशाच्या अंगी वस्तू व सेवा खरेदी करण्याची जी शक्ती असते, त्या शक्तीला पैशाचे मूल्य असे म्हणतात. पैशाचे मूल्य म्हणजे पैशाची खरेदीशक्ती होय. पैशाचे मूल्य कसे ठरते? हे सांगणारे काही सिद्धांत अर्थशास्त्रात आढळून येतात. त्यामध्ये चलनसंख्यामान सिद्धांत हा एक सिद्धांत आहे. १६ व्या शतकात होऊन गेलेल्या जीन बोडीन (Jean Bodin) या फ्रेंच अर्थशास्त्रज्ञाने प्रथम या सिद्धांताची मांडणी केली. त्यांनी पैशाच्या मूल्य विषयक काही विचार मांडले होते. १९ व्या शतकातील जे.एस.मिल यांनी या सिद्धांताची मांडणी केली. जॉन लॉक, ह्यूम, रिकार्डो, विकसेल, केमरर यांनीही या सिद्धांतात मोलाची भर घातली. विसाव्या शतकातील अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ प्रा. आयर्व्हिंग फिशर यांनी या सिद्धांताची काटेकोर मांडणी केली. म्हणून पैशाचा मूल्यविषयक चलनसंख्यामान सिद्धांत हा फिशर यांचा सिद्धांत म्हणून ओळखला जातो. फिशर यांनी १९११ साली The Purchasing Power of Money या ग्रंथात आपल्या चलनसंख्यामान सिद्धांताची मांडणी केली आहे. फिशर यांच्या चलनसंख्यामान सिद्धांताला 'व्यवहार दृष्टिकोन' (Transaction Approach) असे म्हणतात. कारण या सिद्धांतानुसार पैशाची मागणी वस्तू आणि सेवांच्या खरेदीसाठी (खरेदी व्यवहारासाठी) केली जाते. फिशर यांनी आपला सिद्धांत समीकरणांच्या साहाय्याने मांडला आहे. म्हणून त्यांच्या सिद्धांताला 'विनिमय समीकरणे'(Transaction Equations) असे म्हणतात.

**सिद्धांताची गृहीते :-**

फिशर यांच्या चलनसंख्यामान सिद्धांताची गृहीते खालीलप्रमाणे स्पष्ट केली आहेत.

(१) पैशाचा पुरवठा आणि किंमत पातळी यांच्यात प्रत्यक्ष व प्रमाणशीर संबंध असतात.

(२) P (किंमत पातळी) हा घटक क्रियाशून्य (निष्क्रिय) असतो. किंमतीचा इतर घटकावर परिणाम होत नाही. परंतु किंमतीवर पैशाच्या पुरवठ्याचा परिणाम होत असतो.

(३) अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगार असतो.

(४) पैशाचा भ्रमणवेग (V) आणि पतपैशाचा भ्रमणवेग (V')

हे घटक अल्पकाळात स्थिर असतात. परंतु दीर्घकाळात लोकांच्या सवयी, आवडीनिवडी, दळणवळणाच्या सोयी यांचा परिणाम होतो.

(५) व्यवहारांची संख्या (T) हा घटक स्थिर असतो. अल्पकाळात एकूण व्यवहारांची संख्या (वस्तू व सेवांची संख्या) स्थिर असते.

(६) अर्थव्यवस्थेतील सर्व व्यवहार पैशाच्या साहाय्याने होतात.

(७) पैसा (M) आणि पतपैसा (M') यांच्यात प्रमाणशीर संबंध असतात. M मध्ये बदल झाला की M' मध्ये बदल होतो. M मध्ये जेवढा बदल होतो तेवढा M' मध्ये बदल होतो. M मध्ये वाढ झाली की M' मध्ये वाढ होते. M मध्ये घट झाली की M' मध्ये घट होते. M दुप्पट केल्यास M' दुप्पट होतो.

(८) या सिद्धांताने दीर्घकाळ विचारात घेतला आहे. दीर्घकाळातच सिद्धांत खरा ठरतो.

(९) पैसा फक्त विनिमय माध्यमाचे कार्य करतो.

(१०) अल्पकाळात पैशाची मागणी स्थिर असते.

**सिद्धांताची मध्यवर्ती कल्पना**

प्रा. फिशर यांचा चलनसंख्यामान सिद्धांत पुढील शब्दात मांडला आहे.

''इतर परिस्थिती कायम असताना अर्थव्यवस्थेतील पैशाचा पुरवठा दुप्पट केला असता वस्तूंच्या किंमती सुद्धा दुप्पट होतात आणि पैशाचे मूल्य निमपट होते. याउलट पैशाचा पुरवठा निमपट केला असता वस्तूंच्या किंमती सुद्धा निमपट होतात आणि पैशाचे मूल्य दुप्पट होते.''

फिशर यांनी आपल्या सिद्धांतात वस्तूंची संख्या आणि पैशाचा भ्रमणवेग इत्यादी गोष्टी स्थिर किंवा कायम असतात असे गृहीत धरले आहे. पैशाच्या पुरवठ्यात वाढ झाली की, लोकांच्या उत्पन्नातही वाढ होते. त्यामुळे त्यांची खरेदीशक्ती वाढून त्यांची वस्तूंची मागणी वाढते. मागणी वाढल्याने उत्पादक वस्तूंच्या किंमती वाढवतात. त्यामुळे पैशाचे मूल्य कमी होते. याउलट अर्थव्यवस्थेतील पैशाचा पुरवठा कमी झाल्यास लोकांचे उत्पन्नही कमी होते. त्यामुळे वस्तूंची मागणी कमी होते. मागणी कमी झाल्याने ती वाढावी यासाठी उत्पादक वस्तूंच्या किंमती कमी करतात. वस्तूंच्या किंमती कमी होणे म्हणजे पैशाचे मूल्य वाढणे होय. अशा प्रकारे वस्तूंच्या किंमती कमी झाल्या की पैशाचे मूल्य वाढते.

**पैशाची मागणी आणि पैशाचा पुरवठा**

फिशर यांच्या चलनसंख्यामान सिद्धांतानुसार 'अर्थव्यवस्थेतील पैशाचे मूल्य हे पैशाच्या मागणी व पुरवठ्यावरून ठरते.' थोडक्यात, पैशाचे मूल्य हे पैशाच्या मागणी व पुरवठ्यावर अवलंबून असते.

**(अ) पैशाची मागणी (Demand for Money) :-**

अर्थव्यवस्थेत पैसा विनिमय माध्यमाचे कार्य करतो. म्हणजे पैशाच्या साहाय्याने वस्तू व सेवा खरेदी करता येतात. म्हणून लोक पैशाची मागणी करतात. एखाद्याा देशातील पैशाची मागणी ही त्या देशात लोकांच्याकडून जेवढ्या वस्तू व सेवा विकत घेतल्या जातात, त्या वस्तू व सेवांच्या एकूण किंमती एवढी असते. वस्तू व सेवा यांच्या संख्येला त्यांच्या किंमतीने गुणले असता जेवढी रक्कम येते, तेवढी पैशाची मागणी असते.

$$Dm = PT$$

Dm = पैशाची मागणी

P = वस्तू व सेवांची सरासरी किंमत

T = लोकांना खरेदी करण्यासाठी उपलब्ध असलेल्या वस्तू व सेवांची संख्या

**P X T = PT (पैशाची मागणी)**

समजा किंमत पातळी (P) १० रूपये आहे. वस्तू व सेवांची संख्या (T) १०० कोटी आहेत. तर वरील सूत्रानुसार पैशाची मागणी खालीलप्रमाणे येईल.

पैशाची मागणी = PT ( P X T )

∴ पैशाची मागणी = १०० रूपये X १०० कोटी

∴ पैशाची मागणी = १००० कोटी रूपये

**(ब) पैशाचा पुरवठा (Supply of Money) :-**

प्रा. फिशर यांनी पैशाच्या पुरवठ्यात विधीग्राह्य पैसा (सरकारने किंवा सरकारच्या वतीने मध्यवर्ती बँकेने निर्माण केलेले चलन) आणि पतपैसा (बँक पैसा/व्यापारी बँकांनी आपल्या पतीवर निर्माण केलेले चलन) अशा दोन्ही प्रकारच्या चलनांचा समावेश केला आहे.

**पैशाचा एकूण पुरवठा = विधीग्राह्या पैसा + पतपैसा**

विधिग्राह्य पैशाला फिशर यांनी M असे म्हटले असहे. तर पतपैशाला M' हे अक्षर वापरले आहे.

**Total Supply of Money = Legal Tender Money + Bank Money**

**Sm = M + M'**

M (विधीग्राह्य पैसा) प्रमाणे M' (पतपैसा) यालाही खरेदीशक्ती असते. M प्रमाणे M' चा उपयोगही खरेदी विक्रीसाठी केला जातो.

**पैशाचा भ्रमणवेग (Velocity of Circulation of Money)**

पैशाच्या भ्रमणवेगाला पैशाचा प्रवेग किंवा पैशाची गतिशीलता असेही म्हणतात. पैसा एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे, दुसऱ्याकडून तिसऱ्याकडे असा फिरत असतो किंवा हस्तांतरित होत असतो. विशिष्ट काळात किंवा एका वर्षाच्या कालावधीत पैसा जितक्या वेळा हस्तांतरित होत असतो, त्या संख्येला पैशाचा भ्रमणवेग असे म्हणतात. समजा, १०० रूपयाची एक नोट एका वर्षात १० जणांकडे हस्तांतरित झाली असेल तर १०० रूपये नोटेचा भ्रमणवेग १० इतका झाला. याचा अर्थ १०० रूपयाची नोट केवळ १०० रूपयाच्या वस्तू खरेदी करत नाही. ती नोट अर्थव्यवस्थेत १० वेळा फिरली म्हणून १०० X १० = १००० रूपयाच्या वस्तू व सेवांची खरेदी झाली, असा त्याचा अर्थ होतो.

**पैशाचा पुरवठा = MV**

**किंवा M X V = पैशाचा पुरवठा**

पैशाला त्याच्या भ्रमणवेगाने गुणले असता पैशाचा एकूण पुरवठा समजतो

M = पैसा

V = पैशाचा भ्रमणवेग

समजा, M (पैसा) १००० को.रू आहे. V(M चा भ्रमणवेग) १० आहे. तर १००० को.रू X १०= १०,००० को. रू. पैशाचा एकूण पुरवठा होईल.

**विनिमय समीकरणे :-**

फिशर याचा चलनसंख्यामान सिद्धांत खालील विविध समीकरणांच्या साहाय्याने स्पष्ट केला आहे.

$$MV = PT$$

**पैशाचा पुरवठा = पैशाची मागणी**

वरील समीकरणातील MV म्हणजे पैशाचा पुरवठा होय. तर PT म्हणजे पैशाची मागणी होय. पैशाचा पुरवठा आणि पैशाची मागणी समान असतात. परंतु वरील समीकरणावरून वस्तूची किंमत निघत नाही. ती काढण्यासाठी वरील समीकरणात खालीलप्रमाणे बदल केला आहे.

$$MV = PT$$

$$\therefore \quad P = \frac{MV}{T}$$

वरील समीकरणातील अक्षरांचा अर्थ खालीलप्रमाणे दिला आहे.

P = सर्वसाधारण किंमत पातळी

M = पैशाचा पुरवठा (विधीग्राह्य पैसा)

V = पैशाचा भ्रमणवेग

T = व्यवहारांची संख्या (वस्तूंची संख्या)

फिशर यांनी आपल्या वरील समीकरणातील V आणि T हे घटक स्थिर असतात असे म्हटले आहे. त्यामुळे M मध्ये (पैशाच्या पुरवठ्यात) बदल झाला की, P मध्ये (वस्तूंच्या किंमतीत) बदल होतो. आणि P मध्ये (वस्तूंच्या किंमतीत) बदल झाला की, पैशाच्या मूल्यात (Vm) बदल होतो.

पैशाच्या पुरवठ्यात पतपैशाचाही समावेश होतो. आणि विधीग्राह्य पैशाप्रमाणे या पतपैशालाही भ्रमणवेग असतो. म्हणून

**पैशाचा एकूण पुरवठा = MV + M’V’**

फिशर यांनी वरती मांडलेल्या $\mathbf{P = \frac{MV}{T}}$ या समीकरणात पतपैशाचा आणि त्या पतपैशाच्या भ्रमणवेगाचा समावेश केलेला नाही. म्हणून फिशर यांनी आपले सुधारित समीकरण खालीलप्रमाणे मांडले आहे.

$$\mathbf{P = \frac{MV + M'V'}{T}}$$

वरील समीकरणातील इंग्रजी अक्षरांचा अर्थ खालीलप्रमाणे दिला आहे.

P = सर्वसाधारण किंमत पातळी

M = विधीग्राह्य पैशाची संख्या (कायदेशीर (LTM) पैसा)

V = विधिग्राह्य पैशाचा भ्रमणवेग


M' = बँकनिर्मित पैसा (पतपैसा/बँक पैसा )

V' = पतपैशाचा भ्रमणवेग

T = एकूण व्यवहारांची संख्या (ज्या वस्तूंची खरेदी-विक्री होते, अशा वस्तूंची संख्या)

फिशर यांनी आपल्या सिद्धांतात V,V' आणि T हे घटक स्थिर असतात, असे म्हटले आहे. तर M' हा घटक (पतपैसा) M वर (विधीग्राह्य पैशावर) अवलंबून असतो असे म्हटले आहे. त्यामुळे पैशाच्या संख्येत (M आणि M' मध्ये) बदल झाला की P मध्ये (वस्तूंच्या किंमतीत) बदल होतो व त्यामुळे पैशाच्या मूल्यात बदल होतो. पैशाच्या पुरवठा आणि किंमत पातळी यांच्यातील संबंध खालील आकृतीत स्पष्ट केले आहेत

**आकृती : पैशाचा पुरवठा आणि वस्तूची किंमत पातळी**



पैशाची मागणी व पुरवठा

वरील आकृतीत OX अक्षावर पैशाची मागणी आणि पैशाचा पुरवठा दर्शविला आहे. OY अक्षावर वस्तूची किमत पातळी दर्शविली आहे. MM आणि $M_1M_1$ हे पैशाच्या पुरवठ्याचे वक्र आहेत. E आणि $E_1$ हे समतोल बिंदू आहेत. OD हा पैशाच्या मागणीचा वक्र आहे. पैशाचा पुरवठा OM असताना किंमत

पातळी OP इतकी आहे. कारण MM हा पैशाच्या पुरवठ्याचा वक्र आणि OD हा पैशाच्या मागणीचा वक्र एकमेकांना E बिंदूत छेदून गेले आहेत. त्यामुळे E या ठिकाणी समतोल साध्य झाला आहे. पैशाचा पुरवठा OM वरून $OM_1$ असा वाढला असता किंमत पातळी सुद्धा OP वरून $OP_1$ अशी वाढलेली दिसते. कारण $M_1M_1$ हा पैशाच्या पुरवठ्याचा वक्र आणि OD हा मागणीचा वक्र एकमेकांना $E_1$ बिंदूत स्पर्श करतात. त्यामुळे नवीन समतोल $E_1$ या ठिकाणी प्रस्थापित होतो.

अशा प्रकारे पैशाच्या पुरवठ्यात ज्या दिशेने बदल होतो, त्या दिशेने वस्तूच्या किंमत पातळीत बदल घडून येतो हे वरील आकृतीवरून दिसून येते. पैशाचा पुरवठा वाढला की वस्तूच्या किंमत पातळीत वाढ होते आणि त्यामुळे पैशाने मूल्य कमी होते. पैशाचा पुरवठा $OM_1$ वरून OM एवढा कमी झाला असता किंमत पातळी सुद्धा $OP_1$ वरून OP एवढी कमी होते. पैशाचा पुरवठा M ते $M_1$ एवढा घटला असता किंमत पातळी सुद्धा P ते $P_1$ एवढी घटते. पैशाचा पुरवठा कमी झाला असता किंमत पातळी घटते आणि पैशाचे मूल्य वाढते.

फिशर यांचा चलनसंख्यामान सिद्धांत खालील उदाहरणांच्या साहाय्याने स्पष्ट केला आहे. उदाहरणार्थ M (विधीग्राह्या पैसा) = 20,000 रूपये, M' (पतपैसा) = 10,000 रूपये, V (विधीग्राह्या पैशाचा भ्रमणवेग) = 10, V' (पतपैशाचा भ्रमणवेग) = 10 आणि T (वस्तूंची संख्या) = 10,000 असेल तर पैशाचे मूल्य खालीलप्रमाणे येईल.

$$P = \frac{MV + M'V'}{T}$$

$$\therefore P = \frac{20,000 \text{ रु } X10 + 10,000 \text{ रु } X10}{10,000 \text{ वस्तू}}$$

$$\therefore P = \frac{200000 + 100000 \text{ रु}}{10,000 \text{ वस्तू}}$$

$$\therefore P = \frac{300000 \text{ रु}}{10,000 \text{ वस्तू}}$$

$\therefore P = 30$ रु वस्तूची किंमत = 30 रु

किंमत मानाची उलट केली असता पैशाचे मूल्य मिळते. म्हणून

$$\text{पैशाचे मूल्य} = \frac{1}{\text{किंमत पातळी}}$$

$$\therefore \text{पैशाचे मूल्य} = \frac{1}{30 \text{ वस्तू}}$$

समजा पैशाचा पुरवठा (M आणि M ) दुप्पट केला तर पैशाचे मूल्य खालीलप्रमाणे येईल. M= ४०,००० रू, M' = २०,००० रूपये, V = १०, T = १०००० वस्तू या उदाहरणात V,V' T हे घटक स्थिर असतात असे मानून केवळ पैशाचा पुरवठा दुप्पट वाढवला आहे.

$$P= \frac{MV+M'V'}{T}$$

$$\therefore \quad P= \frac{40000 \text{ रु } X\ 10+20000 \text{ रु } X\ 10}{10{,}000 \text{ वस्तू}}$$

$$\therefore \quad P= \frac{400000\ X\ 200000}{10{,}000 \text{ वस्तू}}$$

$$\therefore \quad P= \frac{600000}{10{,}000 \text{ वस्तू}}$$

$$\therefore \quad P= 60 \text{ रुपये}$$

वस्तूची किंमत = 60 रुपये

$$\text{पैशाचे मूल्य } Vm= \frac{1}{P}$$

$$\therefore \quad Vm= \frac{1}{60 \text{ वस्तू}}$$

$$\therefore \quad \text{पैशाचे मूल्य } = \frac{1}{60 \text{ वस्तू}}$$

अशा प्रकारे पैशाचा पुरवठा ३००००० रूपयावरून ६००००० रूपये असा दुप्पट केला असता वस्तूची किंमत पातळी सुद्धा ३० रूपयावरून ६० रूपये अशी दुप्पट वाढल्याचे दिसते. आणि पैशाचे मूल्य सुद्धा $\frac{1}{30}$ वस्तूवर $\frac{1}{60}$ वस्तू असे निम्म्याने कमी झाल्याचे दिसते. थोडक्यात

१) पैशाचा पुरवठा आणि किंमत पातळी यांच्यात धन सहसंबंध असतात.

२) पैशाचा पुरवठा आणि पैशाचे मूल्य यांच्यात व्यस्त सहसंबंध असतात.

३) M(पैशाचा पुरवठा) आणि P (वस्तूंची किंमत) यांच्यात प्रमाणशीर संबंध असतात. M चा P वर परिणाम होतो. पण P चा M वर परिणाम होत नाही.

४) तेजी-मंदीचा कालखंड मात्र अपवाद आहे. तेजी-मंदीचा कालखंड संपला की, M मध्ये जेवढा बदल होतो तेवढा P मध्ये बदल होतो.

५) फिशर यांच्या मते किंमत पातळीवर शेजारील देशातील किंमतीतील बदलांचा आणि युद्धाचाही परिणाम होत असतो. परंतु परिस्थिती पूर्ववत झाली की M आणि P यांच्यात प्रमाणशीर बदल होतात.

**सिद्धांताचे टीकात्मक परीक्षण :-**

फिशर यांच्या चलनसंख्यामान सिद्धांतावर विविध अर्थशास्त्रज्ञांनी खालीलप्रमाणे टीका केल्या आहेत.

**(१) पूर्ण रोजगाराचे गृहीत चुकीचे :-**

टीकाकारांच्या मते, पूर्ण रोजगाराचे गृहीत अवास्तव आणि चुकीचे आहे. चुकीच्या गृहीतावर या सिद्धांताची मांडणी करण्यात आली आहे. म्हणून हा सिद्धांत दोषयुक्त आहे. अपूर्ण रोजगाराच्या स्थितीत पैशाचा पुरवठा वाढूनही वस्तूंच्या किंमती वाढत नाहीत. किंवा वस्तूंच्या किंमती वाढतीलच असे नाही. अपूर्ण रोजगाराच्या स्थितीत देशात पैशाचा पुरवठा वाढला की, लोकांचे उत्पन्न वाढते. वस्तूची मागणी वाढते. त्यामुळे उत्पादन वाढते. मागणीप्रमाणे उत्पादन वाढले तरी किंमती वाढतीलच असे नाही.

**(२) व्याजदराकडे दुर्लक्ष :-**

टीकाकारांच्या मते, पैशाच्या पुरवठ्यातील बदलांचा व्याजदरावर होणारा परिणाम या सिद्धांत दुर्लक्षित केला आहे. म्हणून हा सिद्धांत अपुरा आहे. पैशाच्या पुरवठ्याचा व्याजदरावरही परिणाम होतो. पैशाचा पुरवठा बदलला की व्याजदर बदलतात. पण त्याचा विचार फिशर यांनी केलेला नाही.

**(३) पैशाचा भ्रमणवेग (V) स्थिर असतो, हे चूक :-**

दीर्घकाळात पैशाचा भ्रमणवेग स्थिर नसतो. पैशाच्या पुरवठ्याबरोबर (M+M') पैशाचा भ्रमणवेगही बदलतो. पैशाचा पुरवठा वाढला की पैशाचा भ्रमणवेगही वाढतो. मंदीच्या काळात पैशाचा भ्रमणवेग कमी राहतो. कारण लोकांची वस्तूंची मागणी (खरेदी) कमी झालेली असते.

**(४) पैशाचा भ्रमणवेग मोजणे अशक्य :-**

पैशाचा भ्रमणवेग स्थिर नसतो. त्यामुळे पैशाचा भ्रमणवेग मोजता येत नाही. पैशाचा भ्रमणवेग मोजण्याचे कोणतेही साधन अर्थशास्त्रात उपलब्ध नाही.

**(५) सर्व व्यवहार रोखीने चालतात हे चूक :-**

फिशर यांनी आपल्या सिद्धांतात सर्व व्यवहार रोखीने चालतात असे गृहीत धरले आहे. परंतु उधारीवरही अनेक व्यवहार होत असतात. त्याचा विचार सिद्धांतात केलेला नाही अशी टीका टीकाकारांनी केली आहे.

**(६) बचतीकडे दुर्लक्ष :-**

लोक आपणास मिळालेले सर्व उत्पन्न वस्तूच्या खरेदीसाठी खर्च करतात असे फिशर यांनी मानले आहे. पण टीकाकारांच्या मते हे चूक आहे. लोक सर्व उत्पन्न खर्च करत नाहीत. तर उत्पन्नाचा काही हिस्सा बचत करून ठेवतात. बचत रकमेचा विनियोग खरेदीसाठी होत नाही. परंतु त्याचा विचार फिशर यांनी केलेला नाही. लोकांची बचत वाढली की लोकांची वस्तूची मागणी घटते. त्यामुळे वस्तूच्या किंमती घटतात. म्हणजे लोकांचे उत्पन्न वाढूनही वस्तूच्या किंमती वाढत नाहीत.

**(७) पैशाच्या मागणीकडे दुर्लक्ष :-**

पैशाचे मूल्य कसे ठरते? हे स्पष्ट करताना फिशर यांनी आपल्या सिद्धांतात पैशाच्या पुरवठ्याला अवास्तव महत्व दिले आहे. तर पैशाच्या मागणीकडे दुर्लक्ष केले आहे. परंतु पैशाचे मूल्य ठरविण्यात पैशाची मागणी हा घटक सुद्धा महत्वाचा असतो. परंतु त्याकडे फिशर यांनी दुर्लक्ष केले आहे.

**(८) वस्तूंच्या किंमती केवळ पैशाच्या पुरवठ्यावर अवलंबून असतात हे चूक :-**

फिशर यांनी आपल्या सिद्धांतात पैशाच्या पुरवठ्यात बदल झाला असता वस्तूंच्या किंमतीत बदल होतो असे म्हटले आहे. परंतु टीकाकारांच्या मते, वस्तूंच्या किंमती केवळ पैशाच्या पुरवठ्यावर अवलंबून नसतात. तर वस्तूचा उत्पादन खर्च, उत्पन्न, वस्तूची मागणी, वस्तूचा पुरवठा या घटकावर सुद्धा अवलंबून असतात. परंतु त्याचा विचार फिशर यांनी आपल्या सिद्धांतात केलेला नाही.

**(९) पैशाच्या मूल्यसंग्रहाच्या कार्याकडे दुर्लक्ष :-**

फिशर यांनी आपल्या सिद्धांतात पैशाच्या विनिमय माध्यमाच्या कार्याला अधिक महत्व दिले आहे. तर मूल्यसंग्रहाच्या कार्याकडे दुर्लक्ष केले आहे.

**(१०) किंमत (P) हा घटक निष्क्रिय असतो हे चूक :-**

फिशर यांनी आपल्या चलनसंख्यामान सिद्धांतात किंमत (P) हा घटक निष्क्रिय असतो असे म्हटले आहे. परंतु टीकाकारांच्या मते, किंमत हा घटक निष्क्रिय नसतो. तो सक्रिय असतो. किंमतीतील बदलांचा पैशाचा पुरवठा (M व M'), पैशाचा भ्रमणवेग (V व V'), वस्तूंची संख्या (T) आणि उत्पादकांचा नफा या सर्वावर परिणाम होत असतो. परंतु त्याचा विचार फिशर यांनी आपल्या सिद्धांतात केलेला नाही. P चा परिणाम नफ्यावर होतो. P मध्ये (किंमतीत) वाढ झाली की उत्पादकांना उत्पादन वाढीची प्रेरणा मिळते. त्यामुळे उत्पादनात (T) वाढ होते. परंतु त्याचा विचार फिशर यांनी केलेला नाही.

**(११) अल्पकाळाकडे दुर्लक्ष :-**

फिशर यांनी दीर्घकाळ विचारात घेऊन चलनसंख्यामान सिद्धांताची मांडणी केली आहे. त्यामुळे अल्पकाळात किंमतीत बदल का व कसे होतात? त्याचे स्पष्टीकरण या सिद्धांताच्या साहाय्याने होऊ शकत नाही. केन्स म्हणतात, 'दीर्घकाळात आपण सर्वजण मेलेलो असतो'. म्हणून अल्पकाळ महत्वाचा असतो. अल्पकाळातील प्रश्न महत्वाचे असतात.

**(१२) खरेदी व्यवहारांची संख्या (T) स्थिर असते हे चूक :-**

टीकाकारांच्या मते, फिशर म्हणतात त्याप्रमाणे खरेदी व्यवहारांची संख्या स्थिर नसते. कारण पैशाचा पुरवठा वाढला की, लोकांचे उत्पन्न वाढते. त्यामुळे मागणी वाढते. मागणी वाढली की उत्पादनात वाढ होऊन खरेदी व्यवहारात वाढ होते.

**(१३) सरासरी किंमत पातळीला जादा महत्व दिले आहे. :-**

टीकाकारांच्या मते, फिशर यांनी आपल्या सिद्धांतात सरासरी किंमत पातळीला जादा महत्व दिले आहे. उपभोग्य वस्तूंची किंमत पातळी, भांडवली वस्तूची किंमत पातळी, कच्चा मालाची किंमत पातळी अशा वेगवेगळ्याा किंमत पातळ्या असतात. एकच किंमत पातळी नसते. परंतु त्याचा विचार फिशर यांनी केलेला नाही.

**(१४) पैशात (M) जेवढे बदल होतात, तेवढेच पतपैशात (M') बदल होतात हे चूक :-**

फिशर म्हणतात M (विधीग्राह्य पैसा) दुप्पट झाला की पतपैसा (M') दुप्पट होतो. पण असे कायम घडत नाही. काही वेळा M जेवढी वाढ होते तेवढी M' मध्ये होत नाही. M' केवळ M वर अवलंबून नसतो. बँकातील प्राथमिक ठेवी, मध्यवर्ती बँकेचे धारेण, लोकांची कर्जाला असलेली मागणी इत्यादी घटकावर M' अवलंबून असतो. त्याचा विचार फिशर यांनी केलेला नाही.

**(१५) व्यापारचक्राचे स्पष्टीकरण देत नाही. :-**

हा सिद्धांत तेजी-मंदीच्या काळात लागू पडत नाही. मंदीच्या काळात पैशाच्या पुरवठ्यात वाढ करूनही किंमत वाढण्याची खात्री नसते.

**(१६) नवीन सिद्धांताची गरज नाही :-**

ज्याप्रमाणे वस्तूची किंमत ही वस्तूच्या मागणी-पुरवठ्याच्या संतुलनाने ठरते, त्याप्रमाणे पैशाचे मूल्य हे सुद्धा पैशाच्या मागणी -पुरवठ्याच्या संतुलनाने ठरते, त्यामुळे पैशाच्या मूल्याचा नवीन सिद्धांत मांडण्याची गरज नव्हती अशी टीका टीकाकारांनी केली आहे.

**(१७) विदेशातील किंमतीचा विचार केलेला नाही. :-**

टीकाकारांच्या मते, विदेशातील वस्तूंच्या किंमतीचा प्रभाव देशातील वस्तूंच्या किंमतीवर पडत असतो. पण त्याचा विचार फिशर यांनी केलेला नाही.

**(१८) बदलांच्या/परिणामांच्या कालावधीकडे दुर्लक्ष :-**

पैशाच्या पुरवठ्यात बदल झाली की त्याचा परिणाम वस्तूंच्या किंमतीवर होतो असे फिशर यांनी म्हटले आहे. परंतु टीकाकारांच्या मते पैशाच्या पुरवठ्यात बदल झाला की लगेच वस्तूंच्या किंमतीवर परिणाम होत नाही. परिणाम होण्यासाठी काही कालावधी जावा लागतो. परंतु त्याचा विचार फिशर यांनी केलेला नाही.

**फिशर यांच्या सिद्धांताचे महत्व :-**

फिशर यांच्या सिद्धांतावर जरी वरीलप्रमाणे काही टीका करण्याात आल्या असल्या तरी हा सिद्धांत टाकावू ठरत नाही. या सिद्धांतात काही दोष किंवा उणिवा असल्या तरी या सिद्धांताचे काही गुण सुद्धा आहेत. ते पुढीलप्रमाणे

(१) भारतासारख्या देशात फिशर यांच्या सिद्धांताची प्रचिती येते. कारण भारतातील किंमत वाढीला चलन विस्तार (पैशाच्या पुरवठ्याात झालेली वाढ) हाच घटक कारणीभूत आहे. जर्मनीत पहिल्या महायुद्धानंतर जी भाववाढ घडून आली होती, त्यास पैशाचा वाढलेला पुरवठा हाच घटक कारणीभूत होता.

(२) चलनवाढ केल्यानंतर जर उत्पादनात वाढ घडवून आणली नाही तर, भाववाढ होते, हे हा सिद्धांत दाखवून देतो.

(३) भाववाढ रोखण्यासाठी पैशाच्या पुरवठ्यावर नियंत्रण ठेवले पाहिजे, हे या सिध्दांतावरुन हे समजते.

(४) फिशर यांचा हा चलनसंख्यामान सिद्धांत पुढील अर्थतज्ज्ञांना प्रेरणा देणारा ठरला आहे. केंब्रिज विद्याापीठातील अर्थशास्त्रज्ञांना फिशर यांच्या सिद्धांताने नवीन सिद्धांत मांडण्याास प्रेरणा मिळाली आहे.

(५) सरकारला, अर्थतज्ज्ञांना, मध्यवर्ती बँकेला हा सिद्धांत उपयुक्त व मार्गदर्शक आहे.

## रोख शिल्लक दृष्टिकोन (Cash Balance Approach)

**प्रास्ताविक :-**

रोख शिल्लक दृष्टिकोनास 'केंब्रिज समीकरणे' (Cembridge Equations) असेही म्हणतात. हा दृष्टिकोन अमेरिकेतील केंब्रिज विद्यापीठातील मार्शल, पिगू, रॉबर्टसन आणि केन्स या अर्थशास्त्रज्ञांनी विविध समीकरणांच्या साहाय्याने मांडला. म्हणून या दृष्टिकोनास 'केंबिज समीकरणे' असे म्हणतात. फिशर यांनी आपल्या सिद्धांतात पैशाच्या विनिमय माध्यम कार्याला महत्व दिले आहे. तर केंब्रिज विद्यापीठातील अर्थशास्त्रज्ञांनी आपल्या रोख शिल्लक दृष्टिकोनात पैशाच्या मूल्यसंग्रहाच्या कार्याला महत्व दिले आहे. प्रा. आयव्हिंग फिशर यांनी पैशाच्या पुरवठ्यावरून पैशाचे मूल्य ठरते असे म्हटले आहे. तर रोख शिल्लक दृष्टिकोनकर्त्यांनी पैशाच्या मागणीवरून पैशाचे मूल्य ठरते असे म्हटले आहे.

**पैशाचा पुरवठा :-**

रोख शिल्लक सिद्धांतात पैशाच्या भ्रमणवेगाला स्थान नाही. कारण या सिद्धांतात पैशाच्या पुरवठ्याचा विचार 'साठा' (Stock) असा केला आहे. या सिद्धांतानुसार एका विशिष्ट वेळी समाजात (चलनात) असलेला पैशाचा एकूण साठा म्हणजे पैशाचा पुरवठा होय. पैशाच्या पुरवठ्याात रोख पैशाचा आणि चेकच्या साहाय्याने बँकेस काढता येणाऱ्या पैशाचा समावेश केला आहे. थोडक्यात रोख पैसा + मागणी ठेवी = पैशाचा एकूण पुरवठा होय.

**पैशाची मागणी :-**

या सिद्धांतानुसार रोखतेची मागणी म्हणजे पैशाची मागणी होय. लोक रोख स्वरूपात जे पैसे जवळ बाळगतात त्याला पैशाची मागणी म्हणतात. रोख पैशाच्या साहाय्याने केंव्हाही वस्तू व सेवा विकत घेतात. म्हणून लोक रोख पैशाची मागणी करतात. वर्तमानातील आणि भविष्यातील गरजा भागविण्यासाठी लोक रोख स्वरूपात जवळ पैसे बाळगतात. म्हणजेच रोख पैशाची मागणी करतात. केन्स यांच्या मते खालील तीन कारणासाठी लोक रोख रक्कम जवळ बाळगतात किंवा रोखतेची मागणी करतात.

**(१) दैनंदिन व्यवहार हेतू :-**

रोजचे दैनंदिन व्यवहार पूर्ण करण्यासाठी लोक रोख रक्कम जवळ बाळगतात. दैनंदिन गरजा भागवण्यासाठी जसे की, दूध, भाजी, वर्तमानपत्र, बसगाडीचा प्रवास, किराणा, अन्नधान्य विकत घेण्यासाठी लोक रोखतेची (रोकड रकमेची) मागणी करतात. दैनंदिन व्यवहार हेतूने केली जाणारी रोख पैशाची मागणी ही लोकांच्या उत्पन्नावर अवलंबून असते. लोकांचे उत्पन्न जेवढे जास्त तेवढी दैनंदिन व्यवहार हेतूने केली जाणारी पैशाची मागणी जास्त राहते. या हेतूने केली जाणारी पैशाची मागणी व्याजदराशी संबंधित नसते.

**(२) दक्षता हेतू :-**

भविष्यकाळ अनिश्चित असल्याने भविष्यातील अडचणींना तोंड देता यावे यासाठी लोक रोख पैशाची जी मागणी करतात, त्याला दक्षता हेतूने केलेली रोखतेची मागणी असे म्हणतात. आजारपण, अपघात, बेकारी या समस्यांना कधी तोंड द्यावे लागेल ते सांगता येत नाही. त्यासाठी आपल्या

उत्पन्नातील काही भाग लोक रोख स्वरूपात जवळ ठेवणे पसंत करतात. दक्षता हेतूने लोक रोखतेची मागणी करतात. दक्षता हेतूने केली जाणारी रोख पैशाची मागणी ही व्याजदरावर अवलंबून नसते. तर उत्पन्नावर अवलंबून असते. उत्पन्न अधिक असेल तर दक्षता हेतूने लोक अधिक रक्कम जवळ बाळगतात.

**(३) सट्टेबाजीचा हेतू :-**

वस्तू, शेअर्स, कर्ज रोखे यांच्या किंमती कमी असताना त्यांची मोठ्या प्रमाणावर खरेदी करून ठेवणे आणि त्यांच्या किंमती वाढल्यानंतर त्या विकून प्रचंड नफा कमावणे याला सट्टेबाजी म्हणतात. वस्तू, शेअर्स, कर्जरोखे यांची साठेबाजी व सट्टेबाजी करता यावी म्हणून काही लोक रोख पैशाची मागणी करतात. ही पैशाची मागणी व्याजदराशी संबंधित असते.

अशा प्रकारे केन्स यांच्या मते, दैनंदिन व्यवहार हेतू, दक्षता हेतू आणि सट्टेबाजीचा हेतू अशा तीन हेतूनी लोक रोखतेची मागणी करतात. म्हणजे रोख रक्कम जवळ बाळगतात. यालाच केन्स यांनी 'रोकड पसंती' किंवा 'रोखतेची अभिलाशा' (Liquidity Preference) असे म्हटले आहे. लोकांची रोख पैशाची मागणी ही विशिष्ट काळापुरती किंवा विशिष्ट काळाशी संबंधित असते. रोख शिल्लक सिद्धांतात दैनंदिन व्यवहार हेतूने आणि दक्षता हेतूने केल्या जाणाऱ्या पैशाच्या मागणीचा विचार केला आहे. सट्टेबाजीच्या हेतूने केल्या जाणाऱ्या पैशाच्या मागणीचा विचार केलेला नाही.

रोख शिल्लक सिद्धांतानुसार पैशाचे मूल्य हे पैशाच्या मागणीवर अवलंबून असते. पैशाचा पुरवठा स्थिर असताना देशातील लोक आपल्याजवळ जी रोख शिल्लक ठेवतात, त्यावर पैशाचे मूल्य ठरते. म्हणजेच पैशाचे मूल्य हे पैशाच्या मागणीवर अवलंबून असते. रोख स्वरूपात पैसा जवळ बाळगण्यासाठी लोक पैशाला जी मागणी करतात, त्या पैशाच्या मागणीवर पैशाचे मूल्य अवलंबून असते.

**सिद्धांताची मध्यवर्ती कल्पना :-**

रोख शिल्लक सिद्धांताची मध्यवर्ती कल्पना खालील शब्दात स्पष्ट केली आहे.

''इतर परिस्थिती स्थिर असताना एका विशिष्ट वेळी पैशाचे मूल्य हे पैशाला असलेल्या मागणीवरून आणि पैशाच्या पुरवठ्यावरून ठरते. पैशाच्या मागणीत किंवा पैशाच्या पुरवठ्यात बदल झाल्यास अथवा दोन्ही घटकात बदल झाल्यास पैशाच्या मूल्यात बदल होतात. पैशाचा पुरवठा स्थिर मानला तर पैशाच्या मूल्यावर पैशाच्या मागणीचा परिणाम होतो. म्हणजे पैशाच्या मागणीत बदल झाला की, पैशाच्या मूल्यात बदल होतो.''

''पैशाचा पुरवठा स्थिर असताना पैशाच्या मागणीत वाढ झाली तर पैशाचे मूल्य वाढते. आणि पैशाची मागणी कमी झाली तर पैशाचे मूल्य कमी होते.''

पैशाची मागणी वाढणे म्हणजे एकूण रोखतेत वाढ होणे होय. म्हणजे लोकांच्याकडून जास्त प्रमाणात रोख स्वरूपात पैसा जवळ बाळगणे होय. अशा प्रकारे लोकांच्याकडून रोख पैशाला मागणी वाढली की त्यांच्या वस्तू व सेवावरील एकूण खर्च कमी होतो. त्यामुळे वस्तू व सेवांच्या एकूण मागणीत (प्रभावी मागणीत) वाढ होते. वस्तूंची मागणी कमी झाल्याने उत्पादक वस्तूंच्या किंमती कमी करतात. वस्तूंच्या किंमती कमी होणे म्हणजे पैशाचे मूल्य वाढणे होय. अशा प्रकारे पैशाची मागणी वाढली की पैशाचे मूल्य वाढते.

याउलट पैशाची मागणी कमी झाली की पैशाचे मूल्य कमी होते. पैशाची मागणी कमी होणे म्हणजे एकूण रोखतेत घट होणे होय. पैशाची मागणी कमी होणे म्हणजे लोकांच्याकडून कमी प्रमाणात, रोख स्वरूपात पैसा जवळ बाळगला जाणे होय. त्यामुळे लोकांचा वस्तू व सेवावरील खर्च वाढतो. त्यामुळे वस्तूंची मागणी वाढते. वस्तूला मागणी वाढल्याने उत्पादक वस्तूंच्या किंमती वाढवतात. त्यामुळे पैशाचे मूल्य कमी होते. कारण वस्तूंच्या किंमती वाढणे म्हणजे पैशाचे मूल्य घटणे होय.

अशा प्रकारे पैशाचा पुरवठा स्थिर असताना पैशाची मागणी वाढली तर पैशाचे मूल्य वाढते आणि पैशाची मागणी कमी झाली तर पैशाचे मूल्य कमी होते. पैशाची मागणी आणि पैशाचे मूल्य या दोन घटकात प्रत्यक्ष किंवा सरळ अथवा धन (+ve) संबंध असतात. आणि पैशाची मागणी व वस्तूंची किंमत पातळी या दोन घटकात अप्रत्यक्ष किंवा ऋण अथवा व्यस्त (-ve) संबंध असतात, हे आपणास वरील स्पष्टीकरणावरून समजून येते.

**केंब्रिज समीकरणे**

**(अ) मार्शल यांचे समीकरण**

प्रा.डॉ.आलेफ्रड मार्शल यांनी आपले समीकरण खालीलप्रमाणे मांडले आहे.

$$M = KY + K'A$$

वरील समीकरणातील अक्षरांचा अर्थ खालीलप्रमाणे दिला आहे.

M = पैशाचा एकूण पुरवठा (विधिग्राह्य पैसा + पतपैसा)

K = लोक रोख स्वरूपात स्वत:जवळ बाळगत असलेल्या उत्पन्नाचा हिस्सा

Y = एकूण मौद्रिक राष्ट्रीय उत्पन्न

K' = लोक स्वत:जवळ बाळगत असलेल्या संपत्तीचा हिस्सा.

A = संपत्तीचे एकूण मूल्य (Total value of assets)

वरील समीकरणातील M म्हणजे पैशाचा पुरवठा होय. आणि KY +K'A = पैशाची मागणी होय (समाजाकडून पैशाला असणारी मागणी). उत्पन्न भाग (KY) + संपत्ती भाग (K'A) हे दोन भाग पैशाच्या मागणीत दिसून येतात. परंतु पुढे मार्शल यांच्या अनुयायांनी मार्शल यांच्या समीकरणातील K'A हा भाग काढून टाकला. कारण वस्तू व सेवा खरेदी करण्यासाठी म्हणजे उपभोगासाठी लोक उत्पन्नाचाच वापर करतात. संपत्ती मूल्याचा वापर करत नाहीत. म्हणून समीकरणातील K'A हा भाग मार्शल नंतरच्या त्यांच्या अनुयायांनी काढून टाकला. त्यामुळे मार्शल यांचे समीकरण खालीलप्रमाणे तयार होते.

$$M = KY$$

M = पैशाचा एकूण पुरवठा

K = पैशाची मागणी (उत्पनाचा जेवढा भाग लोक रोख स्वरूपात जवळ बाळगतात, तो भाग)

**Y = वास्तव राष्ट्रीय उत्पन्न**

Y = PO ( किंवा P x O = PO )

Y = मौद्रिक राष्ट्रीय उत्पन्न

P = किंमत पातळी (Price level)

O = उत्पादन (Output)

P x O = मौद्रिक राष्ट्रीय उत्पन्न. उत्पादनाला किंमतीने गुणले असता मौद्रिक राष्ट्रीय उत्पन मिळते. म्हणून PO = एकूण पैशातील राष्ट्रीय उत्पन्न होय. Y = PO असल्याने M = KY न म्हणता M = KPO असेही म्हणता येईल.

$$M = KPO$$

$$\therefore \quad P = \frac{M}{KO} \text{ किंवा } \frac{M}{KO} = P$$

मार्शल यांच्या समर्थकांनी M = KY हे समीकरण मांडले असून त्याच्या आधारे एका उदाहरणाच्या साहाय्याने वस्तूची किंमत आणि पैशाचे मूल्य खालीलप्रमाणे काढले आहे.

समजा पैशाचा पुरवठा (M) 400 रूपये, वास्तव राष्ट्रीय (Y) 2000 किलोग्रॅम गहू, पैशाची मागणी (K) = $\frac{1}{5}$ असेल तर पैशाचे मूल्य किती असेल?

$$M = KY$$

$$\therefore \quad 400 \text{ रुपये} = \frac{1}{5} \times 2000 \text{ किलोग्रॅम गहू}$$

$$\therefore \quad 400 \text{ रुपये} = 400 \text{ किलोग्रॅम गहू}$$

$$\therefore \quad 1 \text{ रुपये} = 1 \text{ किलोग्रॅम गहू}$$

या उदाहरणात 1 रुपयाची किंमत 1 किलोग्रॅम गहू अशी आली आहे. समजा पैशाची मागणी (K) $\frac{1}{5}$ वरुन $\frac{1}{10}$ इतकी निमपट झाली तर पैशाचे मूल्य सुध्दा निमपट होते. हे खालील उदाहरणात स्पष्ट केले आहे. या ठिकाणी M (पैशाचा पुरवठा), Y (वास्तव राष्ट्रीय उत्पन्न) हे घटक स्थिर असतात असे गृहीत धरले आहे.

$$M = KY$$

$$\therefore \quad 400 \text{ रुपये} = \frac{1}{10} \times 2000 \text{ किलोग्रॅम गहू}$$

$$\therefore \quad 400 \text{ रुपये} = 200 \text{ किलोग्रॅम गहू}$$

$$\therefore \quad 1 \text{ रुपये} = \frac{1}{2} \text{ किलोग्रॅम गहू}$$

$$\therefore \quad 1 \text{ रुपयाचे मुल्य} = \frac{1}{2} \text{ किलोग्रॅम गहू}$$

पहिल्या उदाहरणात 1 रूपयाचे मूल्य 1 किलोग्रॅम गहू होते. तर दुसऱ्या उदाहरणात 1 रूपयाचे मूल्य $\frac{1}{2}$ किलोग्रॅम गहू अर्धा किलो इतके कमी झालेले दिसते. कारण पैशाची मागणी $\frac{1}{5}$ वरून $\frac{1}{10}$ इतकी कमी झाली आहे.

**(ब) प्रा. पिगू यांचे समीकरण :-**

प्रा. ए. सी. पिगू यांनी पैशाचे मूल्य कसे ठरते? हे सांगण्यासाठी खालील समीकरण मांडले आहे.

$$P = \frac{KR}{M}$$

P = पैशाचे मूल्य

K = पैशाची मागणी (वास्तव उत्पन्नाचा रोख स्वरूपात जवळ बाळगला जाणारा भाग)

R = वास्तव राष्ट्रीय उत्पन्न (गहू)

M = पैशाची एकूण संख्या

R (वास्तव राष्ट्रीय उत्पन्न) आणि M (पैशाचा पुरवठा) हे घटक स्थिर असतात. म्हणून K मध्ये (पैशाच्या मागणीत) बदल झाला की, P मध्ये (पैशाच्या मूल्यात) बदल होतात. म्हणजे K मध्ये वाढ झाली की P मध्ये वाढ होते.

लोक ज्याप्रमाणे रोख स्वरूपात स्वत:जवळ पैसे ठेवतात त्याप्रमाणे बँकेत ठेवींच्या स्वरूपात ही पैसे ठेवतात. म्हणून पिगू यांनी वरील समीकरणाचा विस्तार करून खालीलप्रमाणे नवीन समीकरण मांडले.

$$P = \frac{KR}{M} [\, C + H\,(I\text{-}C)]$$

C = लोकांनी स्वत:जवळ ठेवलेली रोख रक्कम

H = बँकानी जवळ ठेवलेल्या रोख रक्कमेचे एकूण ठेवीशी असलेले प्रमाण

I-C = विधीग्राह्या पैशापैकी जो भाग लोक बँकेत ठेवींच्या स्वरुपात ठेवतात.

पिगू यांनी आपल्या समीकरणात पैशाच्या पुरवठ्यापेक्षा पैशाच्या मागणीला जास्त महत्व दिले आहे. त्यांच्या समीकरणानुसार पैशाचे मूल्य हे पैशाच्या मागणीवर (K) अवलंबून असते. पिगू यांच्या मते तेजी व मंदीचा परिणाम पैशाच्या मागणीवर होत असतो. तेजीच्या काळात पैशाच्या मागणीत (K मध्ये) घट होते आणि मंदीच्या काळात पैशाच्या मागणीत (K मध्ये) वाढ होते. तेजीच्या काळात किंमती वाढून पैशाचे मूल्य कमी होते. म्हणून लोकांना जास्त उत्पन्न वस्तूच्या खरेदीवर खर्च करावे लागते. त्यामुळे K मध्ये (पैशाच्या मागणीत) घट होते. मंदीच्या काळात वस्तूंच्या किंमती सतत कमी होत असतात. त्यामुळे पैशाचे मूल्य वाढत असते. त्यामुळे लोक खर्च कमी करतात. वर्तमानात खर्च करण्याऐवजी भविष्यात वस्तू व सेवा खरेदी करतात. त्यामुळे उत्पन्नाचा जास्तीत जास्त स्वत:जवळ बाळगतात म्हणून मंदीच्या काळात K मध्ये (पैशाच्या मागणीत) वाढ होत असते.

**पिगू यांच्या समीकरणावरील टीका :–**

टीकाकारांनी पिगू यांच्या समीकरणावर खालीलप्रमाणे टीका केली आहे.

(१) पिगू यांनी आपल्या सिद्धांतात पैशाच्या विनिमय माध्यम या कार्याचा विचार केला नाही. पैसा केवळ मूल्यसंग्रहाचे कार्य करतो असे मानले. व पैशाच्या याच कार्याचा विचार आपल्या सिद्धांतात केला.

(२) बचत आणि गुंतवणूक यामध्ये बदल होत असतात. परंतु त्याचा विचार प्रा. ए. सी पिगू यांनी केलेला नाही.

(३) पिगू यांनी केवळ गहू या एकाच वस्तूचा विचार केला आहे. पैशाचे मूल्य कसे ठरते? हे सांगण्यासाठी त्यांनी केवळ गहू याच वस्तूचा विचार केला आहे.

**(क) प्रा. रॉबर्टसन यांचे समीकरण :–**

पैशाचे मूल्य कसे ठरते? हे सांगण्यासाठी प्रा. रॉबर्टसन यांनी जे समीकरण दिले आहे, ते पुढीलप्रमाणे मांडले आहे.

$$M = K\ P\ T$$

किंमत पातळी आणि पैशाचे मूल्य काढण्यासाठी वरील समीकरणात खालीलप्रमाणे बदल केला आहे.

$$P = \frac{M}{KT}$$

वरील समीकरणातील इंग्रजी अक्षरांचा अर्थ खालीलप्रमाणे दिला आहे.

P = किंमत पातळी

M = पैशाची संख्या (पैशाचा पुरवठा)

T = एका वर्षातील व्यवहारांची / वस्तूंची संख्या

K = व्यवहार करण्यासाठी / वस्तू खरेदी करण्यासाठी जवळ ठेवलेला रोख पैशाचा भाग

रॉबर्टसन यांनी आपल्या समीकरणात K आणि T हे घटक स्थिर असतात. असे गृहीत धरले आहे. त्यामुळे M मध्ये (पैशाच्या पुरवठ्यात) बदल झाला की P मध्ये (किंमत पातळीत) बदल होतात. म्हणजे M ज्या दिशेने बदलतो, त्या दिशेने P मध्ये बदल होतो. M मध्ये वाढ झाली की P मध्ये वाढ होते. M मध्ये घट झाली की P मध्ये घट होते.

M आणि T हे घटक स्थिर गृहीत धरल्यास K चा परिणाम P वर होतो. K आणि P या दोन घटकात व्यस्त संबंध असतात. म्हणजे K मध्ये (पैशाच्या मागणीत) वाढ झाली की किंमत पातळीत घट होते. आणि पैशाचे मूल्य वाढते. याउलट K मध्ये (पैशाच्या मागणीत) घट झाली की P मध्ये (किंमत पातळीत) वाढ होते. आणि पैशाचे मूल्य कमी होते.

**(ड) प्रा. केन्स यांचे समीकरण :-**

लॉर्ड जे. एम. केन्स यांनी 'A Tract on Monetary Reform' या १९२३ मध्ये प्रसिद्ध झालेल्या आपल्या ग्रंथात पैशाचे मूल्य कसे ठरते? हे सांगण्यासाठी जे समीकरण दिले आहे, ते पुढीलप्रमाणे मांडले आहे.

$$n = p\,(k + rk')$$

$$\therefore \quad p = \frac{n}{k + rk'}$$

वरील समीकरणातील इंग्रजी अक्षरांचा अर्थ खालीलप्रमाणे दिला आहे.

n = पैशाची संख्या (विधिग्राह्य चलन व बँकातील ठेवी/ चलनात असलेल्या नोटा व इतर रोकड)

P = उपभोग्य वस्तूंची किंमत

K = विधिग्राह्य चलनाच्या साहाय्याने खरेदी केल्या जाणाऱ्या उपभोग्य वस्तूंची संख्या

4 = बँकेकडील रोख पैसा व मध्यवर्ती बँकेत बँकांनी ठेवलेल्या ठेवी

K' = बँकाकडील ठेवींच्या साहाय्याने लोक किती उपभोग्या वस्तू विकत घेऊ शकतात त्याचे प्रमाण.

उपभोग्य वस्तू व सेवा विकत घेता याव्यात म्हणून लोक रोख पैसे शिल्लक ठेवतात, असे प्रा. केन्स यांनी म्हटले आहे. त्यांच्या मते K, K' आणि 4 हे घटक अल्पकाळात स्थिर असतात. त्यामुळे n चा P वर परिणाम होते. म्हणजे n मध्ये (पैशाच्या पुरवठ्यात) बदल झाला की P मध्ये (उपभोग्य वस्तूंचा किंमतीत) बदल होते. n आणि P मधील बदल समप्रमाणात असतात. n मध्ये जेवढा बदल होतो तेवढा बदल P मध्ये होतो. n मध्ये (पैशाच्या पुरवठ्यात) वाढ झाली की P मध्ये (उपभोग्य वस्तूंच्या किंमतीत) वाढ होते. आणि n मध्ये (पैशाच्या पुरवठ्यात) घट झाली की P मध्ये (उपभोग्य वस्तूंच्या किंमतीत) घट होते. अल्पकाळात K, K' व r हे घटक स्थिर असतात. परंतु दीर्घकाळात हे घटक स्थिर नसतात. त्यांच्यात बदल होतात. त्यामुळे दीर्घकाळात n आणि P मध्ये वर स्पष्ट केल्याप्रमाणे (अल्पकाळाप्रमाणे) संबंध राहतीलच याची खात्री देता येत नाही.

**केंब्रिज दृष्टिकोनावरील टीका :-**

केंब्रिज विद्यापीठातील अर्थतज्ञ मार्शल, पिगू, रॉबर्टसन आणि केन्स यांनी पैशाचे मूल्य कसे ठरते? हे सांगण्यासाठी जो सिद्धांत मांडला आहे त्यास रोख शिल्लक सिद्धांत असे म्हणतात. हे सर्व प्राध्यापक केंब्रिज विद्यापीठात प्राध्यापक होते. म्हणून त्यांच्या सिद्धांताला केंब्रिज दृष्टिकोन असे म्हणतात. या दृष्टिकोनावर विविध टीकाकारांनी ज्या टीका केल्या आहेत, त्या थोडक्यात खालीलप्रमाणे दिल्या आहेत.

**(१) पूर्ण रोजगाराचे गृहीत चुकीचे :-**

केंब्रिज समीकरणामध्ये पूर्ण रोजगाराची स्थिती गृहीत धरली आहे. परंतु पूर्ण रोजगाराचे गृहीत अवास्तव आणि काल्पनिक आहे. प्रत्यक्ष व्यवहारात पूर्ण रोजगार आढळत नाही. अपूर्ण रोजगाराचीच परिस्थिती आढळते. कोणत्याही देशात पूर्ण रोजगार आढळत नाही. चुकीच्या गृहीतावर हा सिद्धांत आधारित असल्याने तो कमकुवत ठरतो.

**(२) सट्टेबाजीच्या (परिकल्पनाच्या) हेतूकडे दुर्लक्ष :-**

दैनंदिन व्यवहार हेतू, दक्षता हेतूसाठी लोक रोख पैशाची मागणी करतात, असे रोख शिल्लक दृष्टिकोनात म्हटले आहे. परंतु सट्टेबाजीच्या हेतूनेही लोक पैशाची मागणी करत असतात. परंतु सट्टेबाजीच्या हेतूने पैशाची जी मागणी केली जाते, त्याचा विचार रोख शिल्लक सिद्धांतात केलेला नाही. त्यामुळे पैशाच्या मागणीचे पुरेसे विवेचन हा सिद्धांत करत नाही, अशी टीका या सिद्धांतावर केली जाते.

**(३) पैशाच्या खरेदीशक्तीला अवास्तव महत्व :-**

रोख शिल्लक दृष्टिकोनात पैशाच्या खरेदीशक्तीला (पैशाच्या मूल्याला) अतिमहत्व दिले आहे. केंब्रिज तज्ञांनी पैशाची खरेदीशक्ती हाच घटक महत्वाचा मानला आहे. देशातील आर्थिक घडामोडींना फारसे महत्व या सिद्धांतात दिलेले नाही. किंमत पातळी, बचत, गुंतवणूक हे घटक सुद्धा महत्वाचे असतात. पण तिकडे या दृष्टिकोनाने (सिद्धांताने) दुर्लक्ष केले आहे.

**(४) व्याजदराकडे दुर्लक्ष :-**

पैशाचे मूल्य कसे ठरते? हे सांगण्यासाठी केंब्रिज अर्थशास्त्रज्ञांनी रोख शिल्लक दृष्टिकोन मांडला. परंतु या सिद्धांतात त्यांनी व्याज दराचा विचार केलेला नाही. व्याज दराचाही परिणाम महत्वाचा असतो. परंतु त्याच विचार या सिद्धांतात केलेला नाही.

**(५) केवळ उपभोग्य वस्तूंच्या किंमतीचा विचार :-**

रोख शिल्लक दृष्टिकोनात केंब्रिज अर्थतज्ञांनी केवळ उपभोग्य वस्तूंच्या किंमतीचा विचार केला आहे. उपभोग्य वस्तू खरेदी करण्यासाठीच लोक पैशाची मागणी करतात असे म्हटले आहे. या सिद्धांतात सर्वसाधारण किंमत पातळीचा विचार केलेला नाही या सिद्धांतात भांडवली वस्तूंचा विचार केलेला नाही.

**(६) पैशाच्या विनिमय माध्यम कार्याकडे दुर्लक्ष :-**

रोख शिल्लक दृष्टिकोनात पैशाच्या मूल्यसंचयाच्या कार्याला महत्व दिले आहे. परंतु पैसा विनिमय माध्यमाचे सुद्धा कार्य करत असतो. परंतु त्याकडे या दृष्टिकोनात लक्ष दिलेले नाही. पैशाचे मूल्यसंचयाचे कार्य जेवढे महत्वाचे आहे तेवढेच विनिमय माध्यमाचे कार्य सुद्धा महत्वाचे आहे.

**(७) गतिशील अर्थवस्थेत लागू पडत नाही. :-**

केंब्रिज अर्थतज्ञांनी लोक रोख पैसा जवळ बाळगण्यासाठी पैशाची जी मागणी करतात, त्या मागणीची लवचिकता १ आहे, असे गृहीत धरले आहे. परंतु हे गृहीत स्थैतिक किंवा गतिहीन अर्थव्यवस्थेत लागू पडते. गतिशील अर्थव्यवस्थेत हे गृहीत लागू पडत नाही. गतिमान अर्थव्यवस्थेत वस्तूंच्या किंमतीत जे बदल होतात, त्याचे स्पष्टीकरण केंब्रिज दृष्टिकोनात मिळत नाही. गतिमान अर्थव्यवस्थेत पैशाची मागणी (K) आणि वस्तू व सेवांची संख्या (T) हे घटक स्थिर नसतात. तर या घटकात कमी-जास्त बदल होत असतात.

**(९) वास्तव राष्ट्रीय उत्पन्नावर अधिक भर :-**

रोख शिल्लक दृष्टिकोनात वास्तव राष्ट्रीय उत्पन्नावर अधिक भर दिला आहे, अशी टीका केली जाते. वास्तव राष्ट्रीय उत्पन्नाचे मोजमाप करताना अनेक अडचणी येतात. त्यामुळे पैशाचे मूल्य अचूक सांगता येत नाही. अशी टीका टीकाकारांनी केली आहे. वास्तव राष्ट्रीय उत्पन्न याच घटकावर पैशाची मागणी अवलंबून नसते. इतरही घटक रोख पैशाच्या मागणीवर परिणाम करत असतात. परंतु त्याचा विचार रोख शिल्लक दृष्टिकोनात केलेला नाही.

**(१०) एकांगी सिद्धांत-पैशाच्या पुरवठ्याकडे दुर्लक्ष :-**

रोख शिल्लक दृष्टिकोनात पैशाचे मूल्य कसे ठरते? हे सांगितले आहे. या दृष्टिकोनात पैशाचा पुरवठा हा घटक स्थिर किंवा कायम असतो असे मानले आहे. पैशाचे मूल्य हे पैशाच्या मागणीवर अवलंबून असते असे म्हटले आहे. परंतु पैशाच्या पुरवठ्याकडे मात्र दुर्लक्ष केले आहे.

**(११) व्यापारचक्राचे स्पष्टीकरण देत नाही :-**

टीकाकारांनी रोख शिल्लक दृष्टिकोनावर अशी टीका केली आहे की, हा सिद्धांत व्यापारचक्राचे स्पष्टीकरण देत नाही. तेजी आणि मंदी या व्यापारचक्राच्या दोन अवस्था का व कशा निर्माण होतात. ते या सिद्धांतात सांगितलेले नाही. तेजी व मंदीच्या काळात किंमतीत जे बदल होतात, त्याचे स्पष्टीकरण हा सिद्धांत देत नाही.

**(१२) पैशाच्या मागणीवर परिणाम करणाऱ्या उत्पन्न व बचतीकडे दुर्लक्ष :-**

पैशाच्या मागणीवर आणि सर्वसाधारण किंमत पातळीवर उत्पन्न, बचत व गुंतवणूक या घटकांचा परिणाम होत असतो. परंतु त्याचा विचार रोख शिल्लक दृष्टिकोनात केलेला नाही अशी टीका टीकाकारांनी केली आहे.

**(१३) पैशाची मागणी व पैशाचा पुरवठा हे दोन स्वतंत्र घटक नाहीत :-**

रोख शिल्लक दृष्टिकोनात पैशाची मागणी व पैशाचा पुरवठा हे दोन स्वतंत्र घटक मानले आहेत. परंतु टीकाकारांच्या मते, हे दोन स्वतंत्र घटक नाहीत.

**(१४) बँकेतील ठेवीतील बदलांचा विचार नाही :-**

बँकांत असलेल्या चालू, बचत आणि मुदत ठेवी यांच्या प्रमाणात बदल होत असतो. त्या बदलांचे परिणाम होत असतात. परंतु त्याचा विचार या दृष्टिकोनात केलेला नाही.

अशा प्रकारे रोख शिल्लक दृष्टिकोनावर विविध अर्थतज्ञांनी वरीलप्रमाणे टीका केल्या आहेत.

**रोख शिल्लक दृष्टिकोनाचे श्रेष्ठत्व :-**

पैशाचे मूल्य कसे ठरते? हे सांगण्यासाठी केंब्रिज विद्यापीठातील मार्शल, पिगू, रॉबर्टसन आणि केन्स या अर्थतज्ञांनी रोख शिल्लक दृष्टिकोन मांडला. या दृष्टिकोनात काही दोष किंवा उणिवा असल्या तरी हा दृष्टिकोन फिशर यांच्या सिद्धांतापेक्षा काही बाबतीत श्रेष्ठ किंवा सरस आहे. खालील मुद्द्यांच्या आधारे केंब्रिज दृष्टिकोनाचे महत्व किंवा श्रेष्ठत्व स्पष्ट केले आहे.

**(१) वस्तूच्या किंमत पातळीतील बदल समजण्यास उपयुक्त :-**

पैशाचा पुरवठा स्थिर असताना समाजाच्या रोकड प्राधान्य प्रवृत्तीत बदल झाला तर त्याचा वस्तूच्या किंमतीवर (किंमत पातळीवर) परिणाम होतो. किंमत पातळीत होणारे हे बदल मार्शल यांच्या समीकरणावरून लक्षात येतात.

**(२) मानवी हेतू, मानवी वागणूक यांना महत्व :-**

मानवी हेतूंचा आणि मानवी वागणूकीचा किंमत पातळीवर परिणाम होत असतो. त्याचा विचार या सिध्दांतात केलेला आहे म्हणून हा सिध्दांत सरस वाटतो.

**(३) अल्पकाळाचा विचार :-**

रोख शिल्लक सिद्धांतात अल्पकाळाचा विचार करण्यात आला आहे. व्यक्तीच्या दृष्टीने अल्पकाळ महत्वाचा असतो. अल्पकालीन प्रश्न महत्वाचे असतात. या सिद्धांताने दीर्घकाळ विचारात न घेता अल्पकाळ विचारात घेतला असल्याने हा सिद्धांत सरस वाटतो.

**(४) भ्रमणवेगातील बदल समजतात :-**

पैशाच्या चलनवेगात किंवा भ्रमणवेगात बदल का होतात? त्याचे स्पष्टीकरण रोख शिल्लक दृष्टिकोन देतो. म्हणून हा सिद्धांत श्रेष्ठ वाटतो.

**(५) पैशाची मागणी व पुरवठ्याचा विचार :-**

पैशाचे मूल्य कसे ठरते? हे सांगण्यासाठी रोख शिल्लक दृष्टिकोनाने पैशाची मागणी आणि पैशाचा पुरवठा या दोन्ही घटकांचा विचार केला आहे. हे या सिद्धांताचे महत्व आहे.

**(६) अंतिम वस्तूंचा विचार :-**

रोख शिल्लक दृष्टिकोनात पैशाचे मूल्य कसे ठरते? हे स्पष्ट करण्यासाठी अंतिम वस्तूंच्या किंमतीचा विचार केला आहे.

**(७) रोजगार पातळी :-**

देशातील रोजगार पातळी आणि उत्पन्न पातळी निश्चित करण्यासाठी रोख शिल्लक दृष्टिकोन महत्वाचा आहे.

**(८) रोकड प्राधान्य प्रवृत्ती व पैशाचे मूल्य :-**

लोक विविध उद्देशाने रोख रक्कम जवळ बाळगतात. त्याला रोकड पसंती किंवा रोकड प्राधान्य प्रवृत्ती असे म्हणतात. रोकड प्राधान्य प्रवृत्ती कमी-जास्त झाली तर त्याचा वस्तूच्या किंमत पातळीवर परिणाम होऊन पैशाच्या मूल्यावरही परिणाम होतो. अशा प्रकारे रोकड प्राधान्य प्रवृत्ती आणि पैशाचे मूल्य यांच्यातील संबंध या सिद्धांताने स्पष्ट केले आहेत.

**(९) वास्तव राष्ट्रीय उत्पन्नाला महत्व :-**

पैशाचे मूल्य कसे ठरते? हे सांगण्यासाठी एकूण वास्तव राष्ट्रीय उत्पन्नाचा विचार केला आहे. सर्वसाधारण किंमत पातळीचा विचार न करता विशिष्ट वस्तूचा विचार करून पैशाचे मूल्य कसे ठरते? ते सांगितले आहे.

**(१०) पैशाची मागणी (K) मापन करणे सोपे :-**

रोख शिल्लक दृष्टिकोनात रोख शिल्लक रकमेचा विचार केला आहे. लोकांचा एकूण खर्च मोजणे अवघड असते. पण लोकांच्या जवळ असलेल्या रोख शिल्लक रकमेची मोजमाप करणे सोपे व शक्य असते.

**(११) व्यापारचक्राचे विश्लेषण :-**

व्यापारचक्राचे म्हणजेच तेजी-मंदीचे विश्लेषण करण्यासाठी रोख शिल्लक दृष्टिकोन अत्यंत उपयुक्त आहे.

अशा प्रकारे केंब्रिज दृष्टिकोन हा फिशरच्या विनिमय समीकरणापेक्षा काही बाबतीत श्रेष्ठ आहे. केंब्रिज दृष्टिकोनाच्या श्रेष्ठत्वाचे मुद्दे वरीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत.

**फिशर आणि केंब्रिज दृष्टिकोनाची तुलना**

आयर्व्हिंग फिशर आणि केंब्रिज विद्यापीठातील मार्शल, पिगू, रॉबर्टसन, केन्स यांनी पैशाचे मूल्य कसे ठरते? हे सांगण्यासाठी दोन वेगवेगळे सिद्धांत मांडले आहेत. दोन्ही सिद्धांतांची तुलना केल्यावर लक्षात येते की, दोन्ही सिद्धांतात काही बाबतीत फरक आहे. तर काही बाबतीत साम्य आहे. दोन्ही सिद्धांतातील साम्य आणि भेद पाहणे आवश्याक आहे. ते या ठिकाणी सांगितले आहे.

**फिशरचा चलनसंख्यामान सिद्धांत आणि केंब्रिज दृष्टिकोन यांच्यातील साम्य**

प्रा. आयर्व्हिंग फिशर यांचा चलनसंख्यामान सिद्धांत आणि केंब्रिज दृष्टिकोन या दोन सिद्धांतामध्ये खालील बाबतीत साम्य आढळते.

**(१) पैशाच्या मागणी व पुरवठ्याचा विचार :-**

पैशाचे मूल्य कसे ठरते? हे सांगण्यासाठी फिशर यांचा चलनसंख्यामान सिद्धांत आणि केंब्रिज दृष्टिकोन या दोन्ही सिद्धांतात पैशाच्या मागणीचा व पैशाच्या पुरवठ्याचा विचार केला आहे. पैशाचे मूल्य हे पैशाच्या मागणीवर आणि पैशाच्या पुरवठ्यावर अवलंबून असते असे दोन्ही सिद्धांतात मांडण्यात आले आहे. पैशाच्या मागणी व पुरवठ्याच्या संतुलनातून पैशाचे मूल्य ठरते असे दोन्ही दृष्टिकोनात सांगितले आहे. हे या दोन्ही सिध्दांतामधील साम्य आहे.

**(२) पैशाचा पुरवठा व किंमत पातळी यांच्यातील संबंध :-**

पैशाचा पुरवठा व किंमत पातळीत प्रत्यक्ष संबंध असतात असे फिशर यांच्या व्यवहार दृष्टिकोनात आणि केंब्रिज दृष्टिकोनात स्पष्ट केले आहे. म्हणजे पैशाचा पुरवठा वाढला की किंमती (सर्वसाधारण किंमत पातळी) वाढतात आणि पैशाचा पुरवठा घटला की किंमती घटतात हे दोन्ही सिद्धांतात आढळून येते. [P = fc (M)]

**(३) पैशाचा पुरवठा आणि पैशाचे मूल्य यांच्यातील संबंध :-**

फिशर यांचा व्यवहार दृष्टिकोन आणि रोख शिल्लक दृष्टिकोन या दोन्ही दृष्टिकोनामध्ये (सिद्धांतात) आणखी एका बाबतीत साम्य आहे आणि ते म्हणजे या दोन्ही दृष्टिकोनात पैशाचा पुरवठा आणि पैशाचे मूल्य यांच्यात व्यस्त (-ve) संबंध असतात असे मानले आहे म्हणजे पैशाचा पुरवठा वाढला की पैशाचे मूल्य कमी होते. आणि पैशाचा पुरवठा घटला की पैशाचे मूल्य वाढते. हे दोन्ही सिद्धांतात आढळून येते.

**(४) पैशाच्या मागणीची लवचिकता (एकक)**

फिशर यांच्या चलन संख्यामान सिद्धांतात आणि रोख शिल्लक दृष्टिकोनात पैशाच्या मागणीची लवचिकता १ असते असे मानले आहे. दोन्ही सिद्धांतात या बाबतीत साम्य असल्याचे आढळून येते.

**(५) पूर्ण रोजगार पातळी :-**

फिशर यांच्या व्यवहार दृष्टिकोनात आणि रोख शिल्लक दृष्टिकोनात पूर्ण रोजगाराची अवस्था गृहीत धरली आहे. देशात पूर्ण रोजगार असतो, असे गृहीत धरून सिद्धांत मांडला आहे.

**(६) P, M, T हे घटक सारखेच आहेत.**

फिशर यांच्या चलनसंख्यामान सिद्धांतातील आणि केंब्रिज दृष्टिकोनातील P, M, T हे घटक सारखेच आहेत.

**फिशर यांचा चलनसंख्यामान सिद्धांत आणि केंब्रिज दृष्टिकोन यातील भेद/फरक**

प्रा. आयर्व्हिंग फिशर यांचा चलनसंख्यामान सिद्धात आणि केंब्रिज दृष्टिकोन या दोन दृष्टिकोनात खालील बाबतीत भेद किंवा फरक आहे

| फिशर यांचा चलनसंख्यामान सिद्धांत | केंब्रिज दृष्टिकोन |
|---|---|
| **(१) फिशर यांच्या नावाने प्रसिद्ध**<br>चलनसंख्यामान सिद्धांताची मांडणी फिशर यांच्या अगोदरच्या काही तज्ञांनी केली असली तरी या सिद्धांताची शास्त्रशुद्ध मांडणी अमेरिकन अर्थतज्ञ प्रा. आयर्व्हिंग फिशर यांनी केली. म्हणून हा सिद्धांत फिशर यांच्या नावाने ओळखला जातो. | **(१) केंब्रिज अर्थतज्ञांकडून मांडणी**<br>पैशाचे मूल्य कसे ठरते? हे सांगणारा रोख शिल्लक सिद्धांत हा केंब्रिज दृष्टिकोन आणि केंब्रिज समीकरणे या नावाने ओळखला जातो. ह्या दृष्टिकोनाची मांडणी अमेरिकेतील केंब्रिज विद्याापीठातील मार्शल, पिगू, रॉबर्टसन, केन्स या अर्थतज्ञांनी केली आहे. |
| **(२) व्यापक दृष्टिकोन**<br>फिशर यांचा चलनसंख्यामान सिद्धांत (व्यवहार दृष्टिकोन) हा व्यापक वाटतो. फिशर यांनी आपल्या सिद्धांतात सर्वसाधारण किंमत पातळीचा (P) विचार केला आहे. सर्वसाधारण किंमत पातळी उपभोग्य वस्तू तसेच भांडवली वस्तूशी संबंधित असते. म्हणून फिशर यांचा व्यवहार दृष्टिकोन व्यापक स्वरूपाचा वाटतो. | **(२) संकुचित दृष्टिकोन**<br>केंब्रिज यांचा रोख शिल्लक दृष्टिकोन फिशर यांच्या समीकरणाच्या तुलनेत संकुचित वाटतो. पिगू आणि केन्स यांनी आपल्या दृष्टिकोनात केवळ उपभोग्य वस्तूंच्या किंमतींचा विचार केला आहे. केंब्रिज यांचा रोख शिल्लक सिद्धांत फिशर यांच्या दृष्टिकोनाच्या तुलनेत संकुचित वाटतो. |

| फिशर यांचा चलनसंख्यामान सिद्धांत | केंब्रिज दृष्टिकोन |
| --- | --- |
| (३) **विनिमय माध्यम कार्यांचा विचार**<br>आयर्व्हिंग फिशर यांनी आपल्या चलन संख्यामान सिद्धांतात पैशाच्या विनिमय माध्यमाच्या कार्यावर भर दिला आहे. | **(३) मूल्यसंग्रहाच्या कार्याला महत्व**<br>केंब्रिज अर्थतज्ञांनी आपल्या दृष्टिकोनात पैशाच्या मूल्यसंग्रहाच्या कार्याला महत्व दिले आहे. |
| **(४) पैशाची मागणी केवळ दैनंदिन व्यवहार हेतूसाठी**<br>आयर्व्हिंग फिशर यांनी आपल्या सिद्धांतात पैशाची मागणी केवळ दैनंदिन व्यवहार हेतूसाठी लोक करतात असे म्हटले आहे. | **(४) पैशाची मागणी दैनंदिन व्यवहार आणि दक्षता हेतूसाठी**<br>केंब्रिज दृष्टिकोनात पैशाची मागणी दैनंदिन व्यवहार हेतू आणि दक्षता हेतूसाठी केली जाते असे म्हटले आहे. |
| **(५) पैशाची मागणी स्थिर असते.**<br>फिशर यांनी आपल्या चलनसंख्यामान सिद्धांतात पैशाची मागणी स्थिर असते असे मानून पैशाच्या पुरवठ्याला महत्व दिले आहे | **(५) पैशाचा पुरवठा स्थिर असतो.**<br>केंब्रिज अर्थतज्ञांनी पैशाचा पुरवठा स्थिर असतो असे मानले आहे. त्यांनी पैशाचे मूल्य निश्चितीत पैशाची मागणी हा घटक महत्वाचा असतो, असे मानले आहे. |
| **(६) पैशाच्या भ्रमणवेगाचा विचार**<br>फिशर यांनी आपल्या चलनसंख्यामान सिद्धांतात पैशाचा भ्रमणवेग विचारात घेतला आहे. | **(६) भ्रमणवेगाचा विचार नाही.**<br>केंब्रिज यांनी आपल्या चलनसंख्यामान सिद्धांतात पैशाच्या भ्रमणवेगाचा विचार केलेला नाही. |
| **(७) पैशाचा पुरवठा व किंमत पातळी यांच्यातील संबंध**<br>फिशर यांनी पैशाचा पुरवठा व किंमत पातळी यांच्यातील संबंध स्पष्ट केले आहेत. पैशाचा पुरवठा वाढला की किंमतपातळी वाढते. आणि पैशाचा पुरवठा घटला की किंमत पातळी घटते. म्हणजे पैशाचा पुरवठा व किंमत पातळी या दोन घटकात प्रत्यक्ष आणि प्रमाणशीर संबंध असतात. | **(७) पैशाची मागणी व किंमत पातळी यांच्यातील संबंध**<br>केंब्रिज दृष्टिकोनात पैशाची मागणी व किंमत पातळी यांच्यातील संबंध स्पष्ट केले आहेत. पैशाची मागणी वाढली की किंमत पातळी घटते आणि पैशाची मागणी घटली की किंमत पातळी वाढते. अशा प्रकारे पैशाची मागणी आणि किंमत पातळी या दोन घटकात व्यस्त संबंध असतात. |

| फिशर यांचा चलनसंख्यामान सिद्धांत | केंब्रिज दृष्टिकोन |
|---|---|
| **(८) मुद्रेचा प्रवाह (Money as Flow)**<br>फिशर यांच्या चलनसंख्यामान सिद्धांतातील पैशाचा प्रवाह संकल्पना मानली आहे. | **(८) मुद्रेचा साठा (Money as Stock)**<br>केंब्रिज दृष्टिकोनात पैशाचा साठा ही संकल्पना मानली आहे. |
| **(९) पैशाचा पुरवठा व पैशाचे मूल्य यांच्यातील संबंध**<br>फिशर यांच्या चलनसंख्यामान सिद्धांतानुसार पैशाचा पुरवठा वाढला की पैशाचे मूल्य कमी होते आणि पैशाचा पुरवठा घटला की, पैशाचे मूल्य वाढते. अशा प्रकारे पैशाचा पुरवठा व पैशाचे मूल्य या दोन घटकात व्यस्त संबंध असतात | **(९) पैशाची मागणी व पैशाचे मूल्य यांच्यातील संबंध**<br>केंब्रिज दृष्टिकोनात पैशाची मागणी व पैशाचे मूल्य यांच्यात प्रत्यक्ष संबंध असतात. म्हणजे पैशाची मागणी वाढली की पैशाचे मूल्य वाढते आणि पैशाची मागणी घटली की पैशाचे मूल्य घटते. |
| **(१०) यांत्रिकी स्वरूपाचे समीकरण**<br>फिशर यांचे समीकरण यांत्रिकी स्वरूपाचे आहे. | **(१०) वास्तव स्वरूपाचे समीकरण**<br>केंब्रिज समीकरणे फिशर यांच्या समीकरणाप्रमाणे यांत्रिक नाहीत, तर वास्तव आहेत. |
| **(११) रोकड प्राधान्य प्रवृत्तीवर भर नाही.**<br>फिशर यांच्या सिद्धांतात रोकड प्राधान्य प्रवृत्तीला महत्व दिलेले नाही. | **(११) रोकड प्राधान्य प्रवृत्तीवर भर**<br>केंब्रिज दृष्टिकोनात रोकड प्राधान्य प्रवृत्तीला महत्व दिलेले आहे. |
| **(१२) दीर्घकाळाचा विचार**<br>फिशर यांनी दीर्घकाळाचा विचार करून पैशाच्या मूल्याचा चलनसंख्यामान सिद्धांत मांडला आहे. | **(१२) अल्पकाळाचा विचार**<br>केंब्रिज दृष्टिकोनात अल्पकाळाचा विचार केला आहे. |
| **(१३) किंमतपातळीचा विचार**<br>फिशर यांनी आपल्या चलनसंख्यामान सिध्दांतात सर्वसाधारण किंमत पातळीचा (GPL) विचार केला आहे. | **(१३) विशिष्ट वस्तूचा विचार**<br>पैशाचे मूल्य कसे ठरते? हे सांगण्यासाठी केंब्रिज दृष्टिकोनात एकूण वास्तव राष्ट्रीय उत्पन्नाचा विचार केला आहे. सर्वसाधारण किंमत पातळीचा विचार न करता विशिष्ट वस्तूचा विचार करून पैशाचे मूल्य कसे ठरते? ते सांगितले आहे. |

| फिशर यांचा चलनसंख्यामान सिद्धांत | केंब्रिज दृष्टिकोन |
|---|---|
| **(१४) सर्व प्रकारच्या वस्तूंचा विचार**<br>फिशर यांनी आपल्या चलनसंख्यामान सिद्धांतात सर्व प्रकारच्या वस्तूंचा विचार केला आहे. त्याला T हे अक्षर वापरले आहे | **(१४) अंतिम वस्तूंचा विचार**<br>केंब्रिज दृष्टिकोनात केवळ अंतिम वस्तू व सेवांचा (R) विचार केला आहे. |
| **(१५) P चा अर्थ सामान्य किंमत पातळी**<br>फिशर यांच्या सिद्धांतात P चा अर्थ सामान किंमत पातळी असा आहे. | **(१५) P चा अर्थ अंतिम उपभोगाच्या वस्तूची किंमत**<br>केंब्रिज दृष्टिकोनात P चा अर्थ अंतिम उपभोगाच्या वस्तूची किंमत असा आहे. |
| **(१६) वस्तुनिष्ठ तत्वांना महत्व**<br>फिशर यांचा सिद्धांत वस्तुनिष्ठ तत्वांना महत्व देतो. | **(१६) व्यक्तिनिष्ठ, मानवी हेतू, मानवी वागणूकीला महत्व**<br>केंब्रिज दृष्टिकोन मानवी हेतू/मानवी वागणूकीला महत्व देतो. |